|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||

NEW ENGLAND MARATHI MANDAL

नोव्हेंबर २०२०

शालिवाहन शके १९४२
शार्वरी संवत्सर

# अनुबंध

## स्त्री शक्ती विशेषांक



# अनुक्रमणिका


- **संपादकीय**
- **अनुबंध संपादक समिती**
- **अध्यक्षीय मनोगत**
- **कार्यकारिणी समिती**
- **मागोवा**
- **अभिप्राय (गणपती उत्सव)** - ज्योती जोशी
- **ललित लेख**
  - आठवणींच्या हिंदोळ्यावर - आशा सोंदे (सलगर)
  - काळाचा गोड महिमा - पुष्पा लेले (NEMM माजी अध्यक्षा)
  - स्त्री शक्तीचा जागर - अमृता करकरे
  - आधुनिक हिरकणी - दिलीप चावरे
  - An Educator - समिधा साने
  - Compassionate Caregiver - वीणा पेंडसे
  - Woman Power: A Self Reflection - स्वाती शिंदे
  - From Poetry to Film Lyrics - सुनयना कचरू भिडे
  - Reel or Real: Lessons From Acting - आदिती टेलर
  - स्वप्नांना पंख भरारीचे - रसिका भाविक वोरा
  - Women In Technology - नीलिमा कासार
  - Two Sisters - उना आणि गीता गंडभीर
  - सुभाषिते - वैजयंती जोशी
- **कथा**
  - उमरकैद - विद्या भुतकर
  - नारी तू नारायणी - मनिषा विरेंद्र तोडकर
  - Quarantine - नेहा गांधी
  - मेहनत रंग लाती है - माधुरी अशिरगडे
- **कविता**
  - अस्तित्व - प्राची देशमुख
  - राधा - प्राची देशमुख
  - अट्टाहास - प्राची देशमुख
  - गौरी आता जागी झाली आहे - ज्योती जोशी
  - स्त्री शक्ती अन वास्तव - नयना निगळये
  - करुणा अब अरुणा ना जाओ - सुनयना कचरू भिडे
  - वादळी - नयना निगळये
- **बालजगत**
  - चित्रकला - अनुश्री लोटलीकर (११ वर्षे)
  - चित्रकला - अन्विता वाडेकर (११ वर्षे)
  - चित्रकला - केया गांधी (७ वर्षे)
  - चित्रकला - यश भिडे (११ वर्षे)

- चित्रकला - क्रिश गांधी (१० वर्षे)
- शब्दकोडे - रोहिणी जोशी (१७ वर्षे)
- दिवाळी - शरयु जोशी (१४ वर्षे)
- दसरा - अर्णव जोशी (१२ वर्षे)
- The Mysterious Figure - अनुश्री लोटलीकर (११ वर्षे)
- अपंग व अनाथांमधील साम्य - साक्षी सुरेश माच्वल्ला

- **युवा विभाग**
  - चित्रकला - सारा परुळेकर (१५ वर्षे)
  - Gender Inequality In India - रेणुका लाटे (१४ वर्षे)
  - भूषणावह असे - रोहिणी जोशी (१७ वर्षे)
- **लेखक लेखिका सूची**
- **आवाहन (पुढचे लिखाण)**

# संपादकीय

नमस्कार मंडळी,

अनुबंध समिती २०१९-२०२० चा शेवटचा अंक हा विशेषांक म्हणून प्रकाशित करताना विशेष आनंद होत आहे. गेल्या वर्षी जानेवारी मध्ये नवीन समितीच्या कार्यकारिणीतील सचिव या पदाधिकारा व्यतिरिक्त माझ्यावर मासिकाच्या संपादनाची जबाबदारी सोपवण्यात आली. खरेतर माझी पाटी एकदम कोरी होती, म्हणजे या कामाचा पूर्वानुभव नव्हता पण दिलेले काम पूर्ण करण्याचा उत्साह जरूर होता. माझ्या मंडळातील सहकाऱ्यांच्या आणि नव्या आणि जुन्या जाणकार लेखकांच्या मदतीने अनुबंधचे काम सुखकर झाले.

अंकासाठी लागणारी तांत्रिक मदत, अंक जुळवणी तसेच मराठी भाषेची उत्तम जाण असलेला अमेय परांजपे याचा विशेष उल्लेख करते. अमेयने बरेचदा रात्री उशिरा जागून काम पूर्ण केले. तसेच चेतन विधाते, मिलिंद कानिटकर यांच्या अनुभवाचा नक्कीच उपयोग झाला. अंकातील लेखांचे प्रूफ तपासणी साठी मराठीची उत्तम जाण असलेल्यांची मदत झाली.

असे म्हणतात कि, पूर्वतयारी हि कोणत्याही कामाची सुरुवात असते. त्याप्रमाणे अनुबंधसाठी आपल्या विविध वयोगटातील वाचकांना काय वाचायला आवडेल, तरुण पिढीला प्रोत्साहित तसेच त्यांच्या भाषेत वाचता येईल म्हणून इंग्रजी भाषेतील लेख, अंक बांधणी, सुसूत्रता, मागोवा (मंडळाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचा आढावा सदर), आपल्याच समाजातील व्यावसायिकांना जाहिरातीच्या संधीची उपलब्धता इ. चा विचार करून अंकाची निर्मिती केली गेली. अंकासाठी उत्तम साहित्य असेल तरच तो वाचनीय होतो आणि ते मिळवणे फार जिकरीचे आणि सबुरीचे असते. मला सांगण्यास अतिशय आनंद होतो कि, आता आपल्या अंकाला साहित्य देणाऱ्या लेखकांची संख्या वाढली तसेच वाचकांची सुद्धा..

अनुबंधचा ‘स्त्री शक्ती’ विशेषांक प्रकाशित करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे. कारण विशेषांक काढणे हे एक धाडसी पाऊल होते आणि आम्ही ते उचलले. आपण नेहमीच इतिहासातील स्त्री व्यक्तिमत्वे व त्याची माहिती वाचतो किंवा त्यांचे दाखले देत असतो. पण, आताच्या शतकातील आणि आपल्यातीलच तरुण पिढीला सुद्धा सहजगत्या आपल्याशा वाटतील अशा तुमच्या आमच्यातील स्त्रिया, मुलींचे अनुभव, त्यांचा संघर्ष, विचार, आणि यशोगाथा तुमच्यापर्यंत पोहोचवून स्त्री शक्तीचा सन्मान करत आहोत.

यातील काहींची कार्यक्षेत्रे जरा हटके आहेत. ‘तिचा’ स्वप्नपूर्तीकडे जाण्याचा संघर्ष, त्यासाठी लागणारी प्रबळ इच्छाशक्ती, हाती आलेली जबाबदारी, त्यातून मिळणारे पूर्णत्त्वाचे समाधान, घरी ‘होममेकर’ भूमिका ती आनंदाने आणि समर्थपणे निभावत असते. या आणि अनेक भूमिका निभावताना तिची दृष्टी मात्र व्यापक होत आहे. तरीही मला वाटते, आजची स्त्री सामाजिक समानतेच्या लढ्याला तोंड देत आहे. पण हा लढा ज्यांनी अमेरिकेत लढला त्या अमेरिकन सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश कै. रूथ बेडर गिंग्सबर्ग यांना हा विषय श्रद्धांजली ठरेल.

अंकात कथा, काव्यां मधील स्त्री, परिस्थितीला शरण न जात कणखरपणे उभी राहिलेली दिसते. आधुनिक हिरकणी (लेफ्टनंट जनरल डॉक्टर माधुरी कानिटकर) यांची यशोगाथा, काहींच्या आठवणी, पुढारलेल्या स्त्रीविश्वाचे विचार, संस्कृत सुभाषिते यासारख्या लेखनाने हा विशेषांक समृद्ध झाला आहे. तसेच मॅसाच्युसेट्स मध्ये मराठी पालकांच्या

पोटी जन्मलेल्या, ज्यांचे बालपण आपल्या मंडळाच्या सानिध्यात गेले, व आज उच्च पदावर पोहोचलेल्या दोन बहिणींची वाटचाल नक्कीच आपल्या तरुण मुलींना त्यांच्या ध्येयपूर्तीकडे जाण्यास उमेद देईल.

युथ विभागातून सुद्धा स्त्रियांविषयीची प्रामाणिक मते आपल्याला वाचायला मिळतील. 'प्रसिद्ध स्त्रियांचे कोडे' सोडवायला गंमत येईल. कु. रोहिणी जोशीची कामगिरीसुद्धा गौरवास्पद आहे. बालजगतसुद्धा देखणे झाले आहे. अंकाच्या मुखपृष्ठा बद्दल विशेष सांगायचे म्हणजे अमेरिकेत राहणारी मराठी तरुण पिढी, ज्या आदरणीय स्त्रियांना आपले आदर्श मानते त्याचे प्रतीक, पेन्सिलच्या साहाय्याने जान्हवी जोगळेकर या मुलीने चितारलेले आहे.

अशा 'स्त्री-शक्ती' विशेषांकाने आमची समिती शेवट गोड करत आहे, 'Cherry on Top'. अनुबंध च्या विशेषांकासाठी साहित्य दिलेल्या प्रत्येकाची संपादकीय समिती विशेष आभारी आहे. या दोन वर्षांच्या कालावधीत अनेक लेखक मित्र मैत्रिणीशी बंध/नाते जुळले, बरेच काही शिकायला मिळाले. मंडळाचे अध्यक्ष संतोष साळवी, यांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास यामुळे ह्या जबाबदारीचा कधी ताण जाणवला नाही. त्यांचे विशेष आभार.

हा वाचनानंद तुमचा यंदाचा दीपोत्सव लखलखीत करेल अशी आशा करते. आपला प्रतिसाद हीच आमची दाद. धन्यवाद.

आपली,

सौ सीमा कानिटकर

**विशेष नोंद-** स्त्री शक्ती या विशेषांकात काही साहित्य लेखकांच्या विनंतीवरून इंग्रजी भाषेत दिले आहेत. त्यांची आतापर्यंतची वाटचाल तरुण पिढीला वाचता येईल हा एकच उद्देश त्यामागे आहे.

# अनुबंध संपादक समिती

**संपादक :** सीमा कानिटकर

**संपादक सहाय्य :** मिलिंद कानिटकर
संतोष साळवी

**मांडणी व सजावट :** अमेय परांजपे

**जाहिरात सहाय्य :** रवी कुलकर्णी

**मुखपृष्ठ :** जान्हवी जोगळेकर (१४ वर्षे)



|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
NEW ENGLAND MARATHI MANDAL

अनुबंध मासिकात जाहिरात करण्यासाठी कृपया संपर्क करा:

सीमा कानिटकर (संपादक) - seema.kanitkar@nemm.org
रवी कुलकर्णी (वित्त) - ravi.kalkarni@nemm.org



***लेखांत व्यक्त झालेली मते ही पूर्णपणे संबंधित लेखकांची आहेत. न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळ तसेच संपादक समिती त्यांच्याशी सहमत असेलच असे नाही.
***अंकासाठी सर्व काळजी घेतली गेली असली तरी छपाईत किंवा अन्य इतरत्र काही चूक भूल झाली असल्यास उदार मनाने ती नजरेआड कराल अशी आशा आहे.

***अनुबंध मासिकामध्ये सुशोभीकरणासाठी वापरण्यात आलेली चित्रे ही माहिती अंतर्जालातून घेण्यात आलेली आहेत. त्यांचे मालकी हक्क संबंधित मालकांकडे असून न्यू इंग्लंड महाराष्ट्र मंडळाकडे नाहीत.

# अध्यक्षीय मनोगत

नमस्कार मंडळी,

सर्वप्रथम NEMM समिती तर्फे तुम्हा सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!!

दोन वर्षे कधी संपली ते कळलंच नाही. हे कधी शक्य होते? जेव्हां आपण सगळे एकत्र राहून आपल्या कम्युनिटीसाठी सचोटीने काम करतो. तसाच अनुभव मला गेली दोन वर्षे आला.

सर्वप्रथम मला आमच्या कमिटीचे मनापासून कौतुक करावेसे वाटते. आमच्या कमिटीने खरोखरी गेली दोन वर्षे मनापासून माझ्याबरोबर खांद्याला खांदा लावून काम केले आहे. प्रत्येक कमिटी मेंबरने समोर जे दिसेल ते काम, दुसऱ्याची वाट न बघता अतिशय उत्तम रीतीने पार पाडले आहे. तसेच आम्हाला लाभलेल्या Volunteers ची मदत. त्यांनी सदैव मदतीचा हात पुढे केला.

गेली दोन वर्षे आपल्या “NEMM COMMUNITY” ने जी आम्हाला साथ दिली आहे, ती आम्ही कधीच विसरणार नाही. तुमच्या साथीमुळेच आमचा उत्साह द्विगुणित झाला आणि आम्ही भरपूर जोमाने विविध योजना पहिल्या वर्षी सफलरीत्या पार पडू शकलो.

पहिल्या वर्षी जेव्हा आम्ही सुरुवात केली तेव्हाच आम्ही ठरविले की, आपण कार्यक्रमात स्थानिक कलाकारांना, भारतातून येणाऱ्या कलाकारांबरोबर काम करण्याची संधी दिली पाहिजे. त्यामुळे आम्हाला जेव्हा शक्य होते, तेव्हा स्थानिक कलाकारांना भारतातील कलाकारांबरोबर काम करायची संधी दिली. त्याशिवाय इतर कार्यक्रमात स्थानिक व अमेरिकेतील कलाकारांना भरपूर संधी देण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक कार्यक्रमाला आपण शाळेचे रेन्ट भरपूर देतो, त्यामुळे शाळेचा पुरेपूर उपयोग करायचे आमच्या कमिटीने ठरविले, जे दुपारचे दोन ते तीन तास आम्हाला मिळाले, त्या वेळेत आम्ही वेगवेगळी सेमिनार्स, मुलांसाठी आर्ट आणि क्राफ्ट (मराठी सणांनुसार), गुढीपाडवा शोभायात्रा, पाककला स्पर्धा, कॅरम आणि बुद्धिबळ स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजित केल्या. आपल्या “NEMM COMMUNITY” मध्ये सर्वांना आपल्या “न्यू इंग्लंड” रहिवाश्यांसाठी काहीतरी करायची इच्छा असते, त्यासाठी आम्ही काही कार्यक्रमांना “विंटर क्लोथ ड्राईव्ह” आणि “कॅन फूड ड्राइव्ह”, “स्कूल सप्लाय ड्राईव्ह” इत्यादी योजना आयोजित केल्या. तसेच वयवर्षे ६०+ च्या पुढील सभासदांसाठी ‘एव्हरग्रीन’ या ग्रुपची मुहूर्तमेढ रोवली आणि नव्याने जॉईन झालेल्या युथचा ग्रुप परत चालू केला.आमच्या उत्साही, कर्तबगार “Ladies Committee” मेम्बर्सनी फोटो बुथची कल्पना अतिशय चांगल्या पद्धतीने आयोजित केली, आपली हि कल्पना सगळ्यांना एवढी आवडली कि बाकीच्या मंडळांनी सुद्धा फोटो बूथ चालू केले. गेल्या दोन वर्षात आम्ही “अनुबंध” मासिकाची लोकप्रियता भरपूर प्रमाणात वाढवली आहे. आपले बरेच मेंबर्स न चुकता आपले लेख, कविता इत्यादी आपल्या मासिकात वारंवार देत असतात.

आमच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठीचे बुकिंग तसेच मेम्बर्सचा डेटा संकलित करून त्याचे ‘Tugoz’ या संस्थेमार्फत काम सुरळीत चालू केले.

आमचे दुसरे वर्ष संक्रांतीच्या सणाने व्यवस्थित चालू झाले. नेहमीप्रमाणे आम्ही तिळाचे लाडू, हलवा, लहान मुलांचे हलव्याचे दागिने आणि वाणाची ऑर्डर भारतात दिली. “Snow Storm” च्या भीतीपोटी संक्रातीचा कार्यक्रम आपण स्थानिक कलाकारांसोबत किंवा “ईस्ट कोस्ट“ कलाकारांसोबत साजरा करतो. ह्या वर्षी दोन एकपात्री प्रयोग “Washington DC” च्या कलाकारांनी यशस्वीरीत्या प्रस्तुत केले आणि आपल्या प्रेक्षकांना देखील दोन्ही प्रयोग अतिशय आवडले. संक्राती पाठोपाठ आपण “गाण्यांचे गाव“ हा अनिरुद्ध जोशी आणि टीमचा कार्यक्रम “BMM” च्या सहकार्याने आयोजित केला आपल्या सर्वांच्या आवडीच्या गाण्यांनी ही मैफिल छान रंगली.

मार्च महिन्यात पूर्ण जगावर कोरोनाचे संकट आले. थोड्याच अवधीत जगाचे सर्व नियम बदलले आणि आपली दिनचर्याच पूर्णपणे बदलली. आमच्या कमिटीने सुद्धा गव्हर्नर आणि “CDC” च्या नियमांचा मान ठेवून आमचे सर्व ठरलेले अतिशय सुंदर कार्यक्रम एका मागोमाग एक अतिशय जड अंतःकरणाने रद्द केले.

ह्या कठीण परीस्थितीत देखील आमच्या कमीटीने हार मानली नाही. नव्या जोमाने कमिटी पुन्हा कामाला लागली आणि त्यातूनच “Covid Fundraising”, महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम, “NEMM GOT TALENT”, “ONLINE गणेशोत्सव“ इत्यादी वेगळ्या प्रकारचे कार्यक्रम आम्ही आपल्या समोर सादर केले. आमच्या प्रत्येक व्हर्चुअल कार्यक्रमाला तुम्ही उस्फुर्तपणे प्रतिसाद दिलात त्याबद्दल पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार.

जेव्हा आम्ही कमिटीच्या कामाला दोन वर्षांपूर्वी सुरुवात केली तेव्हा मी आपल्या मंडळाचे एकेचाळीस वर्षापूर्वी लिहिलेले “Constitution” वाचले. एकेचाळीस वर्षात मंडळाचे कार्यक्रम, काम करण्याची पद्धत, नियम इत्यादी भरपूर बदलले आहेत. त्यावेळीच ठरवलं कि आपण ट्रस्टींच्या सहकार्याने “NEMM Constitution” पूर्णपणे नवीन लिहिली पाहिजे. ट्रस्टींच्या मदतीमुळे आपली नवीन Constitution ऑक्टोबर महिन्यात जनरल बॉडी मीटिंगमध्ये सर्वमताने मान्य झाली.

आता माझी अध्यक्षपदाची दोन वर्षे जवळ जवळ पूर्ण झाली आहेत. गेल्या दोन वर्षात जी मला आपल्या समाजाबरोबर जवळून काम करायची संधी मिळाली ती मी आयुष्यभर विसरणार नाही. खरोखर आपला समाज कुठच्याही चांगल्या कार्याला मनापासून पाठींबा देतो ह्याबद्दल दुमतच नाही.

कुठलेही समाजकार्य म्हटले कि आपल्या बरोबर आपल्या साथीदाराची देखील तेवढीच तारेवरची कसरत चालू असते. गेल्या दोन वर्षात माझी पत्नी, श्वेता (संध्या) साळवीची जी मला साथ मिळाली त्यामुळे हा प्रवास अतिशय सुंदर झाला. आम्ही दोघे उभयतां ह्या दोन वर्षांच्या छान आठवणी, प्रत्येक कार्यक्रमाची लगीन घाई, तयारी, ब्रेकफास्ट आणि डिनरच्या वेळी NEMM च्या गप्पा इत्यादी गोष्टीं बरोबर घेऊन जात आहोत. चला तर मंडळी निरोप घेतो.

- संतोष साळवी
अध्यक्ष

## Seva Sahayog Foundation

Regn. No.U85100MH2009NPL195370

**Pune Office:** 18 "Pathik", Vrundavan Society, Nr Shri Shri Ravi Shankar Vidya Mandir, Navi Peth, Mhatre Bridge, Pune 411030.
t: 020 2453 7655
e: pune@sevasahayog.com
w: www.sevasahayog.org

**Mumbai Office:** 1st floor, Pitruchhaya, S.H. Paralkar Marg, Senapati Bapat Chowk, Near Vaze Hospital, Shivaji Park, Dadar Mumbai 400028

**Regd. Address:** 602, Pearl, Juhu Sai Darshan, 5th N.S. Extn. Rd, J.V.P.D, Mumbai - 400049
t: 022 24446094 / 9833994754.

SEVA SAHAYOG
Celebrating Humanity

Celebrating Humanity

22nd July, 2020
New England Marathi Mandal,
Boston, MA.

Dear Santosh ji,

Thank you so much for the generous donation of **Rs. 2,24,960** made to Seva Sahayog Foundation, by New England Marathi Mandal. We really appreciate your support towards the Covid-19 Relief work in Pune, India.

With the help of this donation, we were able to provide Food Kits and Cloth Masks to **200 underprivileged families** in Pune. 800 beneficiaries were able to get the Food Kits at a time when it was needed most.

We really appreciate the generous support of the entire New England Marathi Mandal group for this noble cause.

Thanks & Regards,

Shailesh Ghatpande
Director - Operations
Seva Sahayog Foundation, PUNE

---

## UMassMemorial Marlborough Hospital

15723

157 Union Street
Marlborough, MA 01752
Tel: 508-481-5000
www.umassmemorial.org

Mr. Santosh Salvi
New England Marathi Mandal
4 Azela Lane
Nashua, NH 03062

Dear Mr. Salvi,

On behalf of UMass Memorial – Marlborough Hospital Board of Trustees, all of our caregivers and most importantly, our patients and our community, I want to thank New England Marathi Mandal for the most generous donation of $3,000 to our Covid-19 Relief Fund. We truly appreciate the philanthropic support you have chosen to give to Marlborough Hospital during this historic and challenging pandemic.

We are truly proud of our caregivers and all that they are doing to respond to this health crisis. The challenges they face each and every day caring for very scared, vulnerable and sick patients and families has been overwhelming, exhausting, satisfying and fulfilling. Our staff is knowledgeable, well-trained, nimble and extremely cautious as they continue to adapt to the ever-evolving new information, protocols, guidelines, procedures and processes continue.

The Covid-19 Relief Fund we have set up, and organizations have chosen to donate to, has given us the ability to purchase the necessary equipment to fight the coronavirus. PPE, ventilators, hand sanitizer, gowns and the list goes on and on, are expensive, in short supply and frankly, the amount of supplies we need was certainly not in our budget. Your support has helped enable us to make sure our caregivers have the best facility, equipment and resources available to treat and to care for these very, very sick patients. You truly have made an investment in the health and well-being of the people we care for each day.

Thank you again for your support during these very stressful and challenging times. Please share our deep gratitude with the members or your organization. We truly are indebted to you for directing your philanthropic support to our wonderful community hospital.

Stay well.

With deep gratitude,

Ellen C. Carlucci
Vice President, Development

---

## Nashua Soup Kitchen & Shelter, Inc.

July 2, 2020

Santosh & Shweta Salvi
4 Azalea Ln
Nashua, NH 03062-1894

Dear Santosh & Shweta,

Gifts such as your $51.00 donation on June 12, 2020, for the Nashua Soup Kitchen & Shelter, enable us to feed and house numerous clients on a daily basis. Thank you for being a part of the team.

The past few months have been trying, but with the good weather and smaller numbers of COVID-19 cases in our area, we are moving forward with some exciting updates to how we serve our clients. Starting on June 29th we were able to reopen our dining room for breakfast and dinner, with appropriately distanced seating. To create further seating opportunities, we have setup tables and canopies to enable outside dining, also with appropriately distanced seating. This will allow us to serve more clients on site.

Bagged To-Go meals will continue to be available for clients who prefer to take their meal with them. Our food pantry will continue to distribute pre-packed boxes for the time being with additional produce and frozen Meals for Kids being distributed via the mobile food pantry we offer in conjunction with the Boys & Girls Club of Nashua and United Way of Greater Nashua.

And a bit of good news from the federal government: as part of the CARES ACT, donations to NSKS in the year 2020 will be tax-deductible to a far greater extent than in the past. From the bill: "(Sec. 2204) This section allows a tax deduction for charitable contributions in 2020 up to $300 for taxpayers who do not itemize their tax deductions. (Sec. 2205) This section suspends in 2020 the limitation on cash contributions for purposes of the charitable contribution tax deduction."

We appreciate and are grateful to you for helping us help those in need in our community.

My very best,

Michael Reinke
Executive Director
(603) 889-7770 ext 111

*If in late May or June you received a much belated thank you letter for a donation(s) made in the previous few months, we apologize for the delay and look forward to acknowledging your generosity in a more timely fashion moving forward. In an effort to reduce staff, stationary, and postal costs please consider changing your acknowledgement status to an end of year statement by emailing nsks@nsks.org.. End of year statements will be mailed or emailed in early 2021.*

IRS regulations require us to state NSKS did not provide any goods or services to you in consideration of your tax-deductible contribution. NSKS is a tax-exempt 501(c)(3) organization: Tax ID# 02-0359239.

*~ Visit our website at www.nsks.org and our Facebook page for up-to-date happenings and events. ~*

2 Quincy Street • PO Box 3116 • Nashua, New Hampshire 03061-3116
603-889-7770 • www.nsks.org

# कार्यकारणी समिती (२०१९-२०)


संतोष साळवी


सुहास कासार


सीमा कानिटकर


रवी कुलकर्णी


अंजली माईणकर


अमेय परांजपे


अर्चना पानवलकर


बकुल कानडे


चंद्रकांत शिरोळे


चेतन विधाते


मिलिंद रानडे


संदीप आडगावकर


श्वेता साळवी


स्मिता लाटे


स्वाती शिंदे

# मागोवा

नमस्कार मंडळी, मागील काही महिन्यात मंडळाचे टॅलेंट शो आणि गणपती उत्सव हे कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडले. याच कार्यक्रमाची काही क्षणचित्रे येथे देत आहोत.



















# अभिप्राय - गणपती उत्सव

श्री गजानन प्रसन्न

न्यू इंग्लंड मराठी मंडळाचा 2020 सालचा गणेशोत्सव.

मंडळाचे अध्यक्ष श्री संतोष साळवी यांना,

सप्रेम नमस्कार.

प्रत्येक मराठी माणसाचा गणेशोत्सव हा अतिशय जिव्हाळ्याचा नी आवडता सण असतो असं म्हटल तर अतिशयोक्ती होणार नाही. मग मीही त्याला अपवाद नाही. ह्याच श्रेय अर्थातच लोकमान्य टिळकांना आहे. केवढ्या दूर दृष्टीने त्यांनी ब्रिटीश राजवटीत हा सण चालू केला. श्रावण महिना संपत आला की मला आपल्या मंडळाच्या गणेशोत्सवाचे वेध लागतात. त्रेचाळीस वर्षांपूर्वी मंडळाची स्थापना झाली तेंव्हा श्री गणेशोत्सवाने मंडळाच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. तेंव्हा आपल मंडळ म्हणजे अगदी लहान एक झोपडीच, संतोष तुमच्या (आणि या आधीच्या प्रत्येक अध्यक्ष आणि कमिटीने) त्याचा आज अलिशान राजवाडा केला आहे. हे वैभव पाहून मला अतिशय हर्ष होत आहे. मंडळ नवीन नवीन आघाड्यांवर यशस्वीपणे जात आहे याच फार कौतुक वाटत.

तुम्ही गेले काही वर्ष ही कामगिरी अतिशय उत्तम रित्या बजावत आहात. कालचा गणेशोत्सवाचा सोहळा म्हणजे मंदिराचा कळसच झाला. कार्यक्रमाला सुरुवात वेळेवर झाली हे सुद्धा अतिशय महत्वाच आहे. नेत्रदीपक आणि देखणा असा हा कार्यक्रम झाला. करोना व्हायरसच्या महापुरात खचून न जाता मंडळाच्या कमिटीने अतिशय परिश्रम घेऊन हा उत्सव साजरा केला. याच राहून राहून कौतुक वाटत आहे. झुम माध्यमाच्या द्वारे हा कार्यक्रम सादर केला गेला. ती टेक्निकल बाजू अत्यंत चोखपणे सांभाळणाऱ्या स्वयंसेवकांचे किती आभार मानू? मला या कार्यक्रमातील सर्व स्वयंसेवकांची नांव माहित नाहीत त्यामुळे मी ती इथे घालू शकत नाही तरी त्याबद्दल दिलगीर आहे. पण त्या त्या व्यक्तींची माझ्यातर्फे पाठ थोपटायला विसरू नका (तुमच्यासकट)!

पुजेची आरास खूप कलात्मक आणि नाविन्यपूर्ण होती. तसचं पुजेची षोडशोपचारी थाटातील तयारी, महाप्रसाद आणि मोदक याचं ताट पाहून मला मी भारतात तर नाही नां असं वाटलं. त्याने प्रत्यक्ष गणरायाही प्रसन्न पावला असणार यात शंकाच नाही. श्रीकांत जोशी गुरुजींचे संस्कृत उच्चार अस्खलित होते. आरती झूम मुळे घराघरात दुमदुमली.

पूजा झाल्यावर इतर सगळ्या सभासदांच्या घराघरात साजरा केलेला गणराया दाखवलात ते फारच आवडल. बहुतेक ठिकाणी पुढच्या पिढीने गणपतीची आरास केली होती, ती फार कल्पकतेने केली होती याचा फार आनंद झाला.

लहानपणी आम्ही दादरला घराघरांतून गणपतीचे दर्शन घ्यायला जात असू त्याची सुखद आठवण झाली. त्या सर्वांचे मनापासून कौतुक.

श्री अविनाश पाटील, प्रशांत कुलकर्णी व समीर घैसास यांनी मंडळाचे कायदे कानून अतिशय सोप्या रीतीने सर्वांना समजावून सांगितले. नेहमीप्रमाणे लहान मुलांसाठी सुद्धा छान कार्यक्रम होता. गणपती घडविण्याच प्रात्यक्षिक ही कल्पना इतकी आवडली की मी हाताशी प्लेडो कां नाही ठेवला याची हळहळ वाटली. संतोष त्या कलावंत शिक्षिकेच माझ्यावतीनं अभिनंदन नक्की करा.

संतोष, तुम्ही सगळ्याची ओळख जातीने करून देत होतात आणि त्यांचे आभार ही जाहीररीत्या न विसरता मानलेत, त्यांना क्रेडीट दिलंत हे पाहून अतिशय आनंद झाला. सगळ्यांना सांभाळून घेता नी त्यांच्या अमोल वेळाच-मदतीच महत्व तुम्ही सतत जपता, हे माझ्या गेले काही वर्ष लक्षात आल आहे. हा एक दुर्मिळ गुण सेनेच्या अधिकाऱ्याकडे असणं हे अतिशय महत्वाच आहे नी तो तुमच्याकडे आहे.

शेवटचा सांस्कृतिक कार्यक्रम-डॉ. संजय उपाध्ये याचं प्रवचन. 'मन करा रे प्रसन्न' हे म्हणजे चेरी ऑन द टॉप. त्यांनी ज्ञानेश्वरी नी गीतेचा उपदेश इतका हसत खेळत सहजपणे प्रेक्षकांपर्यंत पोहोचवला की ते प्रवचन होत याचा विसर पडला.

संतोष, सरते शेवटी तुमचा विद्यार्थ्यांना "जपून रहा" हा बहु मोलाचा हळुवार संदेश ऐकल्यावर माझ मन गहिवरून आल. इतकं बारीक सारीक लक्ष तुमच होत. आता सर्वात शेवटी म्हणजे तुमची अर्धांगिनी श्वेता व इतर कुटुंबीय यांचही तेवढच कौतुक मला राहून राहून करावस वाटतंय.  कारण अशा तऱ्हेचं सामाजिक कार्य करण ही अतिशय कठीण कामगिरी असते. त्याला घरच्या मंडळींचा भक्कम पाठींबा मिळाला तरच हे कार्य यशस्वी होत.

नेहमी होणाऱ्या कार्यक्रमात स्नेहीसोबती प्रत्यक्ष भेटतात नी आनंद द्विगुणित होतो. या करोनाच्या साथीत झूम मुळे मिळालेली दिव्य दृष्टीने तुम्ही आम्हाला तो आनंद नक्कीच दिलात.

तुम्ही आयोजित केलेल्या गणेशोत्सवाच गुणगान गायला माझे शब्द तोकडे पडताहेत. आपल्या न्यू इंग्लंड मराठी मंडळाला माझ्या सदैव शुभकामना आहेत. तसचं या पुढे येणाऱ्या प्रत्येक कमिटीलाही माझ्या हार्दिक शुभेच्छा. मन:पूर्वक धन्यवाद.

- ज्योति जोशी

# ललित लेख

## आठवणींच्या हिंदोळ्यावर

**- श्रीमती आशा सोंदे (सलगर)**

आठवणीं या आकाशातील ढगांप्रमाणे अचानक भरून येतात आणि त्या मनात दाटून आल्या कि, डोळ्या समोरून नकळत तरळून जातात. मला वाटते, आयुष्य हे अनेक आठवणीं किंवा प्रचितीचें भांडार आहे. लहानपणापासून आपण जे पाहत आलो, अनुभवले त्या आठवणींनी आपले आयुष्य पुरेपूर भरून पावते. आज त्याच आठवणी, ज्याप्रमाणे भरतीच्या वेळी समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर येऊन धडकतात त्याचप्रमाणे मन:पटलावर येत आहेत.

आज महिला दिनाच्या निमित्ताने बऱ्याच ठिकाणी स्त्री/नारी गौरवाचे कार्यक्रम होत असतात. मोठमोठ्या शिकलेल्या, उच्चपदस्थ, विविध पातळयांवर संघर्ष केलेल्या, राजकारणी स्त्रियांचे विचार टीव्ही, वर्तमानपत्रं, मासिके यातून व्यक्त झालेली दिसतात. काहींचा 'जीवनगौरव' यासारख्या पुरस्कारांनी सत्कारही होतो. सध्याच्या काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून चांगले नेतृत्व केलेल्या स्त्रियांची माहिती वाचायला, बघायला मिळते. पण हे जुन्या काळात म्हणजे एकोणीशेच्या दशकात, स्वात्रंत्र्यपूर्व काळात, बऱ्याच स्त्रिया अश्या होत्या कि त्यांची लहान वयात लग्न व्हायची. शिक्षणाचा अभाव, घरखर्चाला पैसे नसणे ऐक ना अनेक अडचणी. याच काळात 1909 मध्ये खानापूर येथे जन्मलेल्या एका नाजूक, कोवळ्या 12 वर्षाच्या सावित्रीची हि गोष्ट. ज्या वयात बाहुली घेऊन खेळायचे, बागडायचे, फुलायचे त्या वयात हि आठ भावांची एकुलती एक बहीण लग्न करून आपल्या पतीच्या घरी म्हणजे कर्नाटकातील धारवाड येथे आली. मग सुरु झाला तिच्या खडतर आयुष्याचा प्रवास.

सावित्रीचे पती मुंबई मध्ये KEM (King Edward Memorial) हॉस्पिटल मध्ये डॉक्टरकी (MBBS) शिकत होते. तसेच मोठे दीर मुंबईत डॉक्टरकीची प्रॅक्टिस करत होते. पण या नववधूच्या संसाराची सुरुवात सासूसासऱ्याच्या सानिध्यात सुरु झाली. सासरच्या घरचा मोठा राबता. शेणाने घर सारवणे, गाई म्हशींचे दूध काढणे, कंदील, चिमणीच्या उजेडात चुलीत लाकडे टाकून फुंकणी च्या साहाय्याने स्वयंपाक करणे, नणंदांची बाळंतपण, सणवार अश्या सर्व व्यापात कधी स्वतःला विसरून गेली आणि तिचे बालपण हरवून बसली हे तिचे तिलाच समजले नाही. सासूकडे बऱ्याच गोष्टी शिकली. सासू प्रेमळ आणि शांत स्वभावाची होती. तिला या सर्व कामात सांभाळून घेई. तिला या व्यापात माहेरी जायचे सोडा, साधी माहेरची आठवण काढायची सुद्धा सवड मिळत नसे. रात्री थकूनभागून झोपल्यावरमिळालेली विश्रांती तिला पुरे होई. हे सगळे अंगवळणी पडून गेले होते. आपल्या मनीचे हितगुज सांगायला पती हि जवळ नव्हते कि एखादी मैत्रीण सुद्धा नाही. बघता बघता सावित्रीचे पती डॉक्टर झाले आणि पाच वर्षांनी तिला मुंबई शहरात येण्याचा योग्य आला.

मुंबईमध्ये त्यावेळी म्हणजे 1925 मध्ये ब्रिटिशांचे राज्य होते. मुंबईत सावित्रीचा खरा संसार सुरु झाला. आणि गावच्या वातावरणातून आलेल्या सावित्रीच्या आयुष्याला एक वेगळे वळण मिळाले. शहरात आल्यावर प्रथम चूल, शेगडी, स्टोव्ह, गॅस अशी नवनवीन स्वयंपाकघरातील उपकरणे ती लीलया हाताळू लागली. मुंबई शहरातील धावपळीच्या वातावरणात तिची तारांबळ उडत होती. त्यात पती डॉक्टर असल्यामुळे सूट-बूट, टाय, हॅट असा त्यांचा पोशाख आणि तेही फार शिस्तबद्ध त्यामुळे वेळच्यावेळी त्यांना गोष्टी लागत. त्यांच्या दवाखान्याच्या वेळा सांभाळणे, मग पुढे मुले झाल्यावर त्यांच्या बालपणीच्या खोड्या, खेळ, शाळा यात तिचे ती बालपण शोधू लागली. कालांतराने शहरातील विविध दुकाने,

फेरीवाले, शेजारपाजार हे नव्याने अनुभवले व रोजची कामे तिला सोपी वाटायला लागली. व्यवहार करायला शिकली. ओळखी वाढल्या, नातेवाईक, येणारे जाणारे रोगी या सगळ्याशी तिच्या गोड, बोलक्या आणि हसऱ्या स्वभावाने प्रत्येकाची तिने मने जिंकून घेतली. सावित्रीचा मूळचा स्वभाव दुसर्यांना मदत करणे आणि त्यांची सेवा करणे हा होता. ह्यातच तिला आनंद मिळत होता. मग घरी कोणीही येऊ देत, ती त्याच प्रेमाने जमेल तसे त्यांची मदत, आदरातिथ्य करत असे. घरी आलेल्या म्हाताऱ्या पेशंटला ती कॉफी करून द्यायची. मुले injection च्या वेळी रडतात म्हणून लहान मुलांसाठी घरात Chocolate, बिस्किटे ठेवायची हि प्रथा तिनेच सुरु केली होती. कधी म्हाताऱ्या बायकांना घरी पोहोचवण्यास सांगणे, अडचणीत असलेल्या कुटुंबाला घरी जेवणाचा डब्बा पाठविणे, घरी अचानक आलेल्या पाहुण्यांना गरम गरम पिठले भात करून खायला घालणे हे तिच्या नित्याचे आणि आवडीचे काम होते. त्यामुळे कोणीही उपाशी पोटी जात नसत. डॉक्टराना कधी रात्री अपरात्री व्हिझिटला जावे लागे.. मग धैर्यवान सावित्री ते येईपर्यंत त्यांची वाट बघत असे. डॉक्टर तर, गरीब लोकांकडून उपचारांची फी सुद्धा घेत नसत. त्यावेळी लोकांची परिस्थिती जेमतेम बेताची असे. डॉक्टरहि समाजकार्य म्हणून त्याकडे कानाडोळा करत. प्रॅक्टिस चांगली चालू असूनहि हातात जास्त पैसे मिळत नसत. ते म्हणायचे पोट भरण्यासाठी ते पुरे आहे. अजूनपर्यंत सर्वजण त्यांची आणि त्यांच्या समाजकार्याची आठवण काढतात. डॉक्टर म्हणजे देवमाणूस आणि सावित्री म्हणजे साक्षात अन्नपूर्णा. आदर्श पतिपत्नी, निःस्वार्थी वृत्ती, सेवाभावी स्वभावामुळे अनेक लोक त्यांच्याकडे मन मोकळे करत असत. दोघे हि जमेल तशी मदत करत. रोज येणाऱ्या पोस्टमनला गुळ पाणी देणे हे तर नेहमीचे होते. त्यांना विचारायची "एवढे उन्हातून फिरता जरा ताक देऊ का?" ते पण काय, काकू, वाहिनी असे संबोधून विचारपूस करत. तिला कुठल्याही बाबतीत मोठेपणा नव्हता. आणि हो, सावित्रीच्या हातात एक वेगळीच कला होती. ती चिरोटे, चवडे (सारस्वत पदार्थ), घीवर, रुखवताचे पदार्थ सुंदर करायची. ह्यासाठी तिला अनेकांकडे बोलावणे येत असे. लग्नासाठी कायकाय साहित्य लागते त्याची यादी तिला करायला सांगत, तिच्याकडे तर सर्व शुभकार्याला लागणाऱ्या साहित्याचे भांडार होते. सगळे अगदी घासून पुसून स्वच्छ असायचे. ती पुढाकार घेऊन नवऱ्या मुलींची केळवणे, मंगळागौरी, डोहाळेजेवणासारखे समारंभ करत असे. दिव्यांच्या वाती करणे हे तिचे रोजचे काम. ऐनवेळी गडबड नको म्हणून पूजेची तयारी चोख करायची. डॉक्टरांना सगळे वेळच्यावेळी लागायचे. कोणाकडे काहीही मागितलेले त्यांना आवडत नसे. 1500-2000 पापड लाटणे, वर्षाचे मसाले, 20 - 25 बरण्या लोणची बनवायची. लोकांनी मागितले तर सहज त्यांना काढुन द्यायची. तिच्या हातच्या लोणच्याची चव अनेक लोंकाना आवडायची. दिवाळीच्या फराळाचे 15 - 20 पदार्थ बनवल्याशिवाय ती स्वस्थ बसायची नाही. त्या काळी घरोघरी फराळाचे डब्बे पण जात आणि घरी पण पाहुणे फराळाला येत. बुंदी घरी पडून त्याचे लाडू बनवणे हा तर तिचा हातखंडा. सावित्रीचा खास असा एक नाविन्यपूर्ण पदार्थ होता, "अमृतफळ आणि सरदाळवडे". त्याची चव अवीट होती असे लोक म्हणायचे, आणि तशी चव आजपर्यंत कोणालाही जमली नाही. 'वेस्ट पासून बेस्ट' पदार्थ ती चुटकी सरशी बनवायची, कोणलाही घटक पदार्थांचा थांगपत्ता लागायचा नाही. भाज्यांचे देठ, बिया, साली यात प्रोटिन्स असतात आणि ते वाया जाऊ नये यासाठी तिच्याकडे अनेक "टिप्स" असायच्या. एखादा पदार्थ करताकरता ती सहजपणे त्याची उपयुक्तता सांगून जायची. हे सांगण्यात तिला वावगे वाटायचे नाही. मला वाटते ह्या काळात ती असती तर "खवय्ये' च्या कार्यक्रमात नक्की सहभागी झाली असती आणि 'अन्नपूर्णा' सारखे एखादे पुस्तक हि निघाले असते कारण तिला अनेक प्रादेशिक म्हणजे कर्नाटकी, कारवारी, सारस्वती, बेळगावी पदार्थ बनवता यायचे.

दिवाळीला स्वतःला काहीही न मागता पहिले आपल्या घरगड्यांसाठी कपडे आणायला लावायची. तिची मोठी मुलगी शिवणकाम शिकलेली असल्यामुळे तिच्याकडून मापाप्रमाणे कपडे शिवून घ्यायची. त्यांना फटाके, फराळ आणि दिवाळी देऊन चार दिवसांची सुट्टी सुद्धा द्यायची. विशेष म्हणजे तिने स्वतःसाठी हातात घालण्याचे घड्याळ घेतले नाही कि एखादी पर्स. लोक तिला म्हणायची

"डॉक्टरीणबाई, तुम्ही किती साध्या आणि व्यवस्थित राहता, हिरे, मोती तुमच्या अंगावर दिसत नाहीत." त्यावर ती उत्तरायची "माझी मुले हेच माझे हिरे, मोती. 'डॉक्टरीणबाई' हि पदवी माझ्यासारख्या न शिकलेल्या बाईला तुम्ही दिलीत, हाच माझा मोठा दागिना. माझे पती डॉक्टर आहेत याचा मला खूप आभिमान आहे."

घरातील पतीचा दवाखाना, मुलांची शिक्षणे, त्यांच्या आवडीनिवडी हे आनंदाने जगत असताना अचानक तिचे सासरे आजारी पडले आणि त्यांना मुंबईला उपचारांसाठी आणले. आता जणू काही ती एका सत्वपरिक्षेला सामोरी जात होती. वयोमानाने सासऱ्याची कमी झालेली स्मरणशक्ती, मग त्यांची आजारपणातील सेवा, सासऱ्याची दिवसा येणारी झोप आणि रात्रभर मोठ्यामोठाने टाळ्या वाजवून गायलेली भजने, नातेवाईकांची वर्दळ, आदरातिथ्य हे सर्व त्यांच्या मुंबईतील फक्त तीन खोल्यांच्या तिच्या संसारात ती निमूटपणे करायची. दरवर्षी सासऱ्यांच्या वाढदिवस उत्साहात ओवाळून साजरा करायची. कारण ती सांगायची "माझ्या सासूबाई म्हणायच्या, पोरी माझा तुला आशीर्वाद आहे. हि पुण्याई फळाला येईल, आमची केलेली सेवा फुकट जाणार नाही" आणखीन काय हवे असते एका बाईला. सावित्रीच्या कसल्याच अपेक्षा नव्हत्या. एकदा यक्ष्याने धर्मराजाला प्रश्न विचारला "कशाचा त्याग केल्यामुळे मनुष्य सुखी होईल?" त्यावर धर्मराजाने समर्पक उत्तर दिले "लोभाचा/मोहाचा त्याग केलास तर मनुष्य सुखी होईल." भगवत गीतेमध्ये श्रीकृष्णाने स्थितप्रज्ञ माणसाची व्याख्या केली आहे "जो सुखात हुरळून जात नाही तसेच दुःखात खचत नाही तो खरा माणूस." सावित्रीला हे तंतोतंत लागू होते.

पुढे सावित्रीचीच्या संसारात सुखाचे दिवस सुरु झाले. मुले मोठी होऊन शिकून डॉक्टर, इंजिनिअर झाली. तिची आणि डॉक्टरची शिस्त, आणि संस्कार त्यांच्यात दिसे. हसतखेळत, हास्यविनोद करीत त्यांचा सुखाचा संसार चालू होता. हो आणि एक महत्वाचे म्हणजे डॉक्टरचा दरवर्षीचा एक नियम असे, मुद्दाम वेळ काढून सावित्रीला घेऊन ते भारतातील प्रेक्षणीय स्थळे, धार्मिक तीर्थक्षेत्र इत्यादी ठिकाणी घेऊन जात. शनिवार-रविवारी संगीत नाटके, पौराणिक सिनेमा, गीतरामायण असे चांगल्या कार्यक्रमांना सावित्रीला नेवून आनंदी ठेवत. सावित्री अश्या वेळी चांगली ठेवणीतील उंची नऊवारी साडी नेसून डॉक्टरनी दिलेला गजरा केसात माळात असे. त्याकाळी नवऱ्याने एक गाजरा दिला तरी बायको खुश होत असे. डॉक्टरांना गाण्याची अतिशय आवड असल्यामुळे त्यांच्या कडे संगीत मैफिली होत. सावित्रीच्या हातची कॉफी आणि फराळाचा आनंद लुटत मैफिल अतिशय रंगात असे. दुपारी 3-5 यावेळेत दोघेही देवळात प्रवचन, कीर्तनाला जात. सावित्रीने हा नियम अगदी शेवटपर्यंत पाळला.

पुढे डॉक्टरांचे अचानक हृदयविकाराने निधन झाले. ती पुष्कळ खचली पण माहेरी जाऊन आल्यानंतर थोडे दिवसांनी तिने परत स्वतःला सावरले आणि त्यानंतरच्या काळात ती नातवंडामध्ये रमून गेली. एवढेच नाहीतर नातवंडांची लग्नें पण पहिली. पहिल्या पणतूचे दर्शन सोन्याच्या पणतीतुन घेतले. शेवटपर्यंत सावित्री तिच्या इच्छेप्रमाणे चालती बोलती राहून, शांत आणि प्रसन्न मुद्रेने जप करत देवाघरी गेली.

अशी हि स्त्री म्हणजे सावित्री उर्फ पार्वतीबाई दुसरी तिसरी कोणी नसून माझी आई होती. त्या माउलीच्या पोटी माझा जन्म झाला हे मी माझे भाग्य समजते. त्याचा मला आभिमान वाटतो. तिचे सुसंस्कार माझ्या नसानसात मुरले आहेत. अश्या या माझ्या आईला कोटीकोटी प्रणाम. माझ्या आईवडिलांना माझी हीच आदरांजली, या लेखाच्या स्वरूपात अर्पण करते.

*(सांगण्यास अभिमान वाटतो कि, माझे वडील श्री सदाशिव विठ्ठल सलगर (राजाभाऊ), आपले सगळ्यांचे लाडके पु. ल देशपांडे यांचे फॅमिली डॉक्टर होते. कारण पु. ल जोगेश्वरीमध्ये लहानाचे मोठे झाले. त्यांच्या बऱ्याच पुस्तकांमध्ये माझ्या वडिलांचा उल्लेख आढळतो.)*

# काळाचा गोड महिमा

- पुष्पा लेले (NEMM माजी अध्यक्षा)

नुकतेच न्यू इंग्लंड मराठी मंडळाचे zoom वर गणेशोत्सव आणि त्याआधी मुलांचा व मोठ्यांचा गुणदर्शनाचा (Talent show) दर्जेदार कार्यक्रम घरच्या घरी बघता आला म्हणून NEMM च्या कमिटीचे खूप कौतुक वाटून त्या सर्वांचे आभार मानले आणि माझे मन जवळ जवळ ३० वर्ष पुस्तकाची पाने उलटी उघडत जावी तसे मागे गेले.

तेव्हा मी NEMM ची प्रेसिडेंट होते. आम्ही दोघांनी (मी आणि माझा नवरा आनंद लेले) नाटकात भाग घेतला होता. नाटकाचे नाव होते, "घरोघरी हीच बोंब". बोस्टनमधले तीन अंकी झालेले हे पहिलेच मराठी नाटक. नाटकाच्या तालमींच्या वेळी लागणारा खाऊ, settings, prompting एव्हढेच नाही तर नाटकानंतर लागणारे जेवणाचे पदार्थ बनवणे, नंतरची आवराआवर करणे ह्या सर्व गोष्टी आम्ही कलाकारही करीत असू. तुम्हाला ऐकून नवल वाटेल, आम्ही कलाकारही नाटकाचे तिकीट काढत असू. नाटकानंतर लागणारे खाण्याचे पदार्थ potluck करून नेत असू. मंडळाची सभासद संख्या बेताचीच व वार्षिक कौटुंबिक वर्गणी फक्त १० डॉलर्स!!!

त्यानंतर 'आनंद बाजार'! यात काही हौशी पाक कलावंत खाण्याच्या पदार्थांचे बूथ ठेवीत. त्यातून मंडळाला काही जास्तीचे पैसे मिळत. अर्थात हे सांगण्यात काही तक्रारीचा सूर मुळीच नाही. हे सर्व करण्यात आम्हाला आनंदच होता.

समर पिकनिक असायची तेव्हा भज्यांचे पीठ आम्ही बायका तयार करून नेत असू व पुरुषमंडळी पार्कमध्ये भजी तळत. मग त्यासाठी लागणारी मोठी कढई, झारा, तेल हि तयारी पण आलीच. आमचा छोटा ग्रुप समरमध्ये डब्बे घेऊन बीचवर जात असे. त्यानंतर भाद्रपदात येणारे हरतालिका, अगदी उखाण्यासहीत तर गणपती उत्सव मोठ्या प्रमाणात विविध गुणदर्शनच्या कार्यक्रमाने साजरा होई. कोजागिरी पौर्णिमा मात्र दरवर्षी ज्योती व डॉक्टर मधुकर जोशी करीत असत. तेव्हा कथा व काव्य वाचनाचा कार्यक्रम मसाल्याच्या दुधासोबत रंगत असे. तसेच दिवाळी, रेखा व डॉक्टर टिळक यांच्याकडे होई. दिवाळी बहुतेक छोट्या छोट्या गटांची, कुटुंबासोबत होई. मंडळाच्या दिवाळी मध्ये कधी कधी भारतातून नाटके आणीत असू. एका अश्याच मोठ्या कार्यक्रमात स्नेहभोजनसाठी साधारण ७५० पुऱ्या बनवायच्या होत्या, त्यावेळी आनंद (माझा नवरा) लंडन मधील ऑफिसचे काम लवकर संपवून टेन्शन मुळे एक दिवस आधीच घरी आला, घरातील सदस्यांच्या साथीशिवाय हे प्रेसिडेंटपण निभावणे शक्यच नव्हते.

तसेच सगळ्या कुटुंबाला या सगळ्यात आनंद मिळत असे. आत्ताची NEMM ची कमिटी जशी आपापले व्यवसाय, संसार, लहान मुले ह्या सर्व आघाड्या सांभाळून मंडळाचे काम हौसेने करीत आहे, तसेच आम्ही करत असू. आमची मुले हि त्यात उत्साहाने सहभागी होत.

प्रेसिडेंट होण्याआधी काही काळ मी न्यू इंग्लंड मंडळाचे पत्रक हाताने लिहून, सभासदांचे पत्ते घालून पोष्टात नेवून टाकीत असे. पत्र पोहोचल्याची पोचपावती तसेच सभासद येतीलच याची सुद्धा शाश्वती नसे. कॉम्पुटरचा वापर सर्रास नव्हता व गुगल, मराठी फॉन्ट, सेल फोन टेक्सटिंग तर नव्हतेच. कार्यकारी मंडळ एकमेकांशी संपर्क फोनवरून (रात्री मुले झोपल्यावर) साधत असत. हे पत्रलेखनाचे काम मी दोन वर्ष नेमाने केले. प्रेसिडेंट, कोषाध्यक्ष, सेक्रेटरी आणि चार विभाग प्रमुख अशी कमिटी असे. विभाग प्रमुख असल्यामुळे पहिल्या तीन जणांचे काम थोडे सुलभ होई. सभासदांना काही मदत (car ride वगैरे) लागल्यास विभाग प्रमुख करू शकत.

त्यावेळी फोनच्या बिलात हवा तेव्हढा वेळ बोलता येत नसे. फोनवर निरोप ठेवण्याची सुविधा झाल्यावर केवढा आनंद झाला होता म्हणून सांगू ! मुलेही मग येईल तसा निरोप घेत, लिहून ठेवत. एकदा नाटकाची तालीम आमच्याकडे होती आणि माझाच 'पार्ट' चालला होता तर त्याचवेळी माझ्या मुलीला तिच्या नाचाच्या

वर्गातून आणण्याची वेळ झाली माझ्या ज्या मैत्रिणीचा तेव्हा पार्ट नव्हता ती आनंदाने आपणहून तिला आणायला गेली. सर्वांकडे दोनदोन गाड्या नसल्याने काही बंधन येई हे सर्व लिहिण्याचा उद्देश एवढाच कि, NEMM मुळे नुसताच मराठी संस्कृतीच टिकवण्याचा प्रयत्न झाला, असे नाही तर सर्व मराठी कुटुंबातील जवळीक वाढली. स्थल काळानुसार काही मंडळी भौगोलिक दृष्ट्या दूर गेली असली तरी आमची मैत्री आजही टिकून आहे. अगदी आत्ताच्या COVID-19 मध्ये देखील!

म्हणून म्हणते कि, न्यू इंग्लंड मराठी मंडळ तेच आहे, आपली माती आणि प्रेमाची माणसं मागे सोडून आलेल्या मराठी माणसाचा उत्साह तोच आहे, त्यात टेकनॉलॉजिची भरघोस भर पडल्याने हा काळाचा महिमा गोड झाला आहे. आम्ही लावलेले "इवलेसे रोप", "गगनावरी" गेलेले पाहून खूप आनंद होतो. आत्ताच्या कमिटीचे आम्हाला नेहमीच कौतुक वाटते. असेच दर्जेदार कार्यक्रम आम्हाला बघायला मिळण्याची खात्री आहे त्यासाठी कमिटीला मनःपूर्वक शुभाशिर्वाद!

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
New England Marathi Mandal

## Become a Member

न्यू इंग्लंड मराठी मंडळाचे सभासद व्हा आणि आपले बंध, सांस्कृतिक वारसा मराठी मातीशी कायम जोडून ठेवा.

For Membership details click here:
http://nemm.org/index.php/membership/become-a-member-renew-membership

# स्त्री-शक्तीचा जागर

- अमृता करकरे, पुणे

"यत्र नार्यस्तु पुजन्ते, रमन्ते तत्र देवता" मनुस्मृतीतील हे वचन सर्वज्ञात आहे. स्त्रियांविषयी आदर दर्शवणारी, स्त्री-पुरुष समानतेची महती सांगणारी वेदकाळातील अनेक बोधवाक्यंही आपल्याला माहित आहेत. मैत्रेयी, गार्गी या वेदकालीन स्त्रिया आपल्याला जशा माहित आहेत तद्वतच इंग्रजांच्या राजवटीत ईस्ट इंडिया कंपनी, वसाहतवादाविरोधात लढा देण्यासाठी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेणारी राणी चेनम्मा, झांशीची राणी लक्ष्मीबाई, अहिल्याबाई होळकर, महाराणी ताराराणी, जगातील पहिल्या महिला पंतप्रधान श्रीलंकेच्या सिरीमाओ बंदरनायके, भारताच्या दिवंगत पंतप्रधान इंदिरा गांधी, इस्त्रायलच्या पंतप्रधान गोल्डा मायर, फ्रान्सच्या स्वातंत्र्य लढ्यात तरुणपणी उडी घेतलेली जोन ऑफ आर्क, एव्हरेस्ट शिखर पादाक्रांत करणारी पहिली भारतीय महिला गिर्यारोहक बच्चेंद्री पाल, मूळची भारतीय, नासाच्या अंतराळ शोधमोहिमेत सहभागी झालेली पहिली महिला वैज्ञानिक कल्पना चावला... यादी बरीच मोठी आहे परंतु, स्त्री-शक्तीच्या या पाऊलखुणांची दखल इतिहासाने घेतली आहेच शिवाय वर्तमानकाळातील ही अशा बऱ्याच जणींची नावे घेता येतील. प्रत्येकीचं कार्यक्षेत्र वेगळं असलं तरी यशोगाथा समानच. जोन ऑफ आर्कचे स्मरण करताना मला पेशवेकालीन एका मुलीचाही उल्लेख करणं आवश्यक वाटतं ती आहे, मैनावती पेशवे. अत्यंत अल्प पण तेजस्वी जीवन जगलेली नानासाहेब पेशवे (दुसरे) यांची ती एकुलती एक कन्या. अवघ्या 14-15 वर्षांच्या बालवयात तिने इंग्रजांविरूद्ध दिलेला धाडसी लढा हे तिच्यातील स्त्री-शक्तिचं अत्यंत स्पृहणीय रूप आहे. मैनावती आणि तिच्या पित्याने इंग्रजांच्या राजवटीत, त्यांच्या असहाय्य बायका-मुलांसाठी संरक्षण कवच उभं करून, माणुसकीच्या नात्यातून दाखवलेल्या औदार्याची परतफेड इंग्रजांनी मात्र अत्यंत क्रूर पद्धतीने केली. त्यांनी मैनावतीला एका झाडाला बांधून तिला पेटवून दिलं आणि तिचा वध केला. त्यावेळची मैनावतीची कर्तव्य कठोरता, सोशिकता, मृत्यूला कवटाळण्याचे धाडस हे तिचं बहुआयामी, लखलखतं रुप हीच तिच्यातील स्त्री-शक्ती होती, भारताच्या वैभवशाली इतिहासात प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणादायी आणि तेजोमय कारकीर्द गाजवलेल्या आदर्श स्त्रिया होऊन गेल्या आहेत आणि आजही आहेत.

कुठलाही समाज, राष्ट्र वा संस्कृतीची महानता जाणून घ्यायची असेल तेव्हा अशा असामान्य स्त्रियांची दखल घ्यावीच लागेल. या अशा शलाका आहेत ज्यांनी आपली उर्जा आणि शक्तीद्वारे इतिहास रचला. त्या कधी माता, कधी पत्नी, कधी भगिनी या रूपाने कार्यरत असतात. Law Of Conservation Of Energy प्रमाणे स्त्री शक्ती ही अशी अक्षय उर्जा आहे जिचे सातत्याने विविध रुपाने प्रगटीकरण होत असते. भविष्यातही होत असल्याचं दिसेल. ही स्त्री-शक्ती म्हणजे नेमक काय तर प्रत्येत स्त्रीमधील अंगभूत गुण आणि तिला मिळणारं स्वातंत्र्य, स्वायतत्ता यांचा मिलाफ असतो. तिची वैचारिक परिपक्वता, नीतीमूल्ये, विवेक, संवेदनशीलता आणि सहृदयता या सर्वांवर तिचा असलेला दृढ विश्वास असतो. अशा या स्त्री-शक्तीच्या जागरात सर्जनशीलता, कल्पकता आणि प्रतिभा असते. इथं साक्षर आणि निरक्षर हा भेदाभेद नसतो. प्रत्येक स्त्रीच्या ठायी कमी-जास्त प्रमाणात हे सर्वच गुण असतात. मी असं विधान करण्याचं धाडस यासाठी करतेय कारण बरीच वर्षे प्रसारमाध्यमात नोकरी केल्यामुळे माझ्या संपर्कात उच्चशिक्षित, शिक्षित, दहावी-बारावीपर्यंत कशीबशी मजल मारलेल्या आणि अगदी निरक्षर सर्व क्षेत्रात कार्यरत स्त्रिया आल्या. या सर्वजणी चा विचार करायचा झाला तर एखादी उच्चशिक्षित स्त्री ही जेव्हा फॉर्चुन-500 कंपन्यांमध्ये सीईओ पदाची जबाबदारी सांभाळत असताना तिचा इतर अनेक भूमिकांमधून लीलया वावर सुरू असतो. कार्यालय आणि घर यांचा योग्य समतोल सांभाळण्याची तिला कसरत करावी लागत असली तरी, ती या सर्व भूमिका ती उत्कृष्ठ वठवत असते. तिथं साक्षर-निरक्षर ही

मोजपट्टी लावून चालत नाही. कारण अगदी पदपथावर राहून, दिवसभर कोठेतरी कामं करून आपलं आणि आपल्या तान्हुलीचं पोट भरणारी एक तरूणीही मी पाहिली आहे. एक साक्षर तर दुसरी निरक्षर. दोघीही समाजातील "आहेरे" आणि "नाहीरे" वर्गाचे प्रातिनिधीक रूप. दोघींमधील स्त्री-शक्ती त्यांच्याकडून या सर्व भूमिका वठवून घेत असते. फरक असेल तर तो फक्त परंपरेचा, संस्कारांचा.

कुटुंब आणि मुलं यांच्यावर लक्ष केंद्रित करून त्यांची काळजी घेणं एवढी मर्यादित भूमिका काही स्त्रियांच्या वाट्याला येत असली तरी बहुतांशी स्त्रियां घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडतात तेव्हा मात्र अनेक आव्हानांचाही त्यांना सामना करावा लागतो ही वस्तुस्थिती लक्षात घेणे अपरिहार्य आहे.

मी माझ्या वयाच्या १८ व्या वर्षी पहिला Job Interview दिला व Go Air या कंपनीत सिलेक्शन झालं. फक्त Personal Interview नसुन वरील अटी पूर्ण होतायत कां? त्या बघण्यात आले. त्या नंतर Medicals clear करणे आवश्यक होते. त्या नंतर ४५ दिवसांचं ट्रेनिंग असतं. ट्रेनिंगमध्ये First-Aid म्हणजे कुणाला सर्दी झाली तर ते अगदी इमर्जन्सी आली (हार्ट अटॅक) आला तर काय करायचं हे सर्व शिकवतात. Safety and Emergency साठी तयार केले जाते. Emergency दरम्यान काय आणि कसं सांभाळावे याचे प्रशिक्षण दिलं जातं, जेणे करुन असा प्रसंग जर दुर्दैवाने आला तर प्रत्येक crew ने घाबरुन न जाता एक सारखा विचार करावा आणि वागावे. Service मध्ये कसं बोलावं, वागावं, नीटनेटके राहणे, स्वतःला groom करणे, कोणत्या ही परिस्थितीत हसत मुख असावे, ई. शिकवण्यात येते. ट्रेनिंग नंतर सर्वांची लेखी, तोंडी, प्रात्यक्षिक परीक्षा घेतली जाते. प्रात्यक्षिक प्रकारात Fire & smoke drill, Ditching drill आणि Evacuation, Slide drills असतात. परीक्षेमध्ये ९०% ने उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. हे झाल्या नंतर crew म्हणुन लायसेंस (license) मिळतं आणि ते टिकवण्यासाठी दरवर्षी परीक्षा द्यावी लागते ज्यात सुद्धा ९०%च पासिंग असतं. प्रवाश्यांची सुरक्षा हे Flight Attendent crew चं प्रथम कर्तव्य आहे, हे कोणीही जाणून न घेता प्रवास करताना crew ला गृहीत धरतात हि तेवढी खंत वाटते.

पुढे १-१ १/२ वर्षाने मी Jet Airways मध्ये रुजू झाले; तिथे मला International flights करण्याची संधी मिळाली. वेग-वेगळे देश, तिथली पर्यटक स्थळे, लोक संस्कृती पाहायला, जाणून घ्यायला मिळाली. प्रत्येक देश वेगळा तसेच तिथले नियम वेगळे, ते ध्यानी ठेऊन flight

साठी बॅग भरणे. कुठे फळं किंवा ओपन पॅकेट फूड चालत आहे तर कुठे ठराविक किंमती पेक्षा जास्त पैसे चालत नाहीत, काही ठिकाणी तर अगदी च्युईंगम वर बंदी त्यामुळे हे छोटे पण महत्वाचे नियम कळु लागले. महिन्याचं Roster (Schedule) आले की, त्या प्रमाणे आपलीही कामे म्हणजे इतर घरची, बाहेरची अशी ठरवायची म्हणजेच आपले वेळापत्रक आखायचे. अनेक वेळा सण, मंगल प्रसंग, इ. miss झालेत कारण आम्ही flight करायचो. एवढी सगळी धावपळ असतानाही मी मुंबई विद्यापीठातून correspondance ने शिक्षण पूर्ण करून M. A. ची पदवी प्राप्त केली.

सुरवातीला Roster पाहिलं की, कलकत्ता, श्रीनगर किंवा कोणते हि ठिकाण वाचुन आनंद व्हायचा कारण १९व्या वर्षी मुंबई बाहेर एकटीने पडणे हे माझ्या साठी नवीन. हळुहळू Jet Airways मध्ये International flights मुळे Roster मध्ये London, Paris, San Francisco ई. पाहून नवल वाटु लागले, सुरुवातीला, Long haul flights आणि jet lag ने होणारा त्रास अजूनही लक्षात आहे. मग ह्याची सवय होत गेली आणि ७-८ तासांची flight ही छोटी वाटू लागली.

पाहता पाहता September २००५ मध्ये सुरु केलेला प्रवास मी थेट May २०१८ मध्ये U. S. A. ला स्थलांतर करण्यासाठी थांबवला. या काळात मला अनेक चांगले वाईट अनुभव आले व ते मला खूप काही शिकवून गेले. आपण घेतलेल्या कष्टाचे कोणी कौतुक केले की खूप बरे वाटते, साधं flight मधून उतरताना प्रवाश्यानी आपलं नाव घेऊन धन्यवाद देणे सुद्धा एका अर्थी दाद असते.

माझ्या आई- वडीलांप्रमाणे माझ्या सासरच्यांनी ही मला साथ दिली. खास म्हणजे 'भाविक' ने मला support आणि खात्री दिली की मी लग्नानंतर ही हेच करावं ज्यात माझा आनंद आहे.

अशी एका आगळ्या वेगळ्या माझ्या स्वप्नाला पंख देणाऱ्या profession ची कहाणी. एवढंच म्हणने आहे कि काम जेव्हा आपल्या मनाला आवडेल, पटेल असं असतं तेव्हा त्यात मज्जा औरच आहे.

*P.S: My entire flying career has been from India hence rules, regulations, requirements, experiences, etc. are from India. They may differ from other countries.*

# Women in Technology

- नीलिमा कासार

Soniyaa was super excited to join her new job in a software startup in Boston. And why not, she had been passionate about building cool software since she was in college. Her dream was going to shape into reality soon. She was going to step into the next level role of her career, Software Architect.

Within few days into the new job she realized, it's not so easy. She was the only female team member in the architect group. Seemed like there was an unwritten rule: Only male can do that role. While she was enthusiastic about suggesting changes or improvement in current/future architecture, she had no options than holding her thoughts. Her suggestions used to be thrown away in the trash basket right away. While similar or even sub-standard suggestions coming from male counterparts were gladly discussed and widely accepted. The pattern continued and her frustration started to rise day by day. Every day while driving back home, she used to think did I do mistake by jumping in this role? Should I go back to my previous track? How do I overcome this situation? Should I ask for help? If so, who can help?

On a sunny Monday afternoon, she was walking alone in the parking lot having pile of thoughts in her mind. Something shined inside her brain, she remembered her grandpa used to say: if you face a problem only you can find the best solution and no one else! She almost flew to her cube on the 4th floor, grabbed a pen and a handy-dandy notebook and rushed to conference room. She wrote some lines in her notebook for half hour and went back to her cube. She met her close friend and colleague, JoAnn, in the cafeteria for 3 PM coffee and showed her friend what she wrote.

"Women in Technology- Does it even exist? I do not think so. I face lot of challenges at work, but I need to be extraordinarily strong and solve my problems on my own. If I have taken this difficult role and if I want to be successful, I need to stand firm like a rock.

My advice to many other women, like me, who want to be part of Women in Technology:

- Reduce fear. It is your enemy number one. It will not let you achieve what you want.
- Never give up approach - Be confident that solution I am proposing is correct. I did more and more research, gained thorough knowledge about it to make sure I have detail understanding of subject.
- I decided to not pay attention to people who were discouraging

me. I made sure that their thing does not impact me.

- Start working more with cross functional teams, learn from them and empower yourself
- Focus more on presentation skill. Prepare well before presenting to teams. If you are well prepared, you will not be afraid of presenting to even "C" level audience. I tried this for few months and could see my presentation skills improved a lot.
- Speak up when needed and as appropriate. Tomorrow never comes.
- Join a group of like-minded women colleagues in your company, have meaningful conversations with them that will boost your confidence.

**Morale**

- Women are usually afraid of taking more challenging roles. They should not be afraid of challenges. You can do anything and everything men can do.
- Girls should always find a way to overcome challenges. We usually let them go. Giving up is not an option.
- Gain more knowledge, keep your eyes and ears open so that you can contribute confidently the group discussions on various topics like current events, technology, sports and much more.
- Try to be more independent and try to solve problems on your own. No need to seek help all the time and rely on someone else

Remember WE – Women Empowerment is the key to success for Women in Technology"

*(Neelima Kasar is working as an Application Architect in the Enterprise Architecture group at Advisor360. Technology is her passion. Neelima always likes to learn about new technologies and implement them in a solution and likes to teach Computer Technology to younger students. She enjoys her free time with her 2 teenagers and husband.)*

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
New England Marathi Mandal

**Looking for a Graphic Designer**

Good Volunteering oppourtunity at NEMM.

Graphic Designer Needed for Anubandh Magazine.
Please contact: registration@nemm.org

Students can apply.
Students Volunteering hours will be recognized by NEMM.

# Two Sisters

## - उना आणि गीता गंडभीर

This is a tale of two sisters. Like all children of immigrants, though our own timeline begins at birth, our parents' journey to America is the real beginning of the story. Our parents, Sharad and Lalita, came to Massachusetts via Canada. He arrived first, in 1963, in pursuit of an engineering degree at Worcester Polytechnic Institute. She followed him (perhaps the only time she's ever followed anyone) and completed her medical residency in this country. They settled in Worcester, MA, where I was born, and later moved to Newton, a quiet, leafy suburb with what matters most to Indian parents, a top-notch public chool system. My sister Geeta arrived four years after me, and our brother Ashwin eight years after that.

The three of us were raised to be both independent and interdependent, especially as more families from India moved to America. Geeta and I attended a weekly cultural school and all the local events of the Marathi community, surrounded by the warm noise of uncles, aunts and cousins who may or may not have been blood relatives but were family nonetheless. Having our grandparents live with us made us deeply aware of our rich culture - the food, the language, the traditions. Still, we persisted. I went to a women's college, Bryn Mawr, where I majored in English and Anthropology, two subjects dear to my heart but difficult to explain in terms of possible careers. Two years later, after working a number of random temp jobs, I decided to apply to law school. In all honesty, it was a decision I backed into, rather than charging toward with enthusiasm, mostly because I was tired of work that didn't challenge me.
I returned to the basement of the home where I grew up to attend Northeastern University School of Law in Boston. NUSL's public interest focus and unique co-op program allows students to alternate a quarter of school with a quarter of work experience after the first year; this gave me the chance to try different jobs and travel to other places. My first two co-ops were at a Legal Services center focused on education and a small law firm handling employment issues. Those were in Boston, and by my third co-op I was ready to try something different: Hawai'i.

I knew I wasn't cut out for a big firm job or corporate law, but in Hawai'i, even that type of work was a little more appealing. I could walk to and from work on the beach, and weekends were spent island-hopping to hike and swim. The only downside was that Honolulu is expensive, and I shared an apartment with two fellow law students. That downside, happily, turned out to be an upside,

because a wonderful, sweet, adventurous Irish guy from Boston named Phil turned out to be one of those roommates, and we eventually ended up married.

Meanwhile, Geeta chose an even less traveled road than the Last Frontier - after attending SUNY Purchase, and studying visual art, anthropology and Spanish, she moved to Brooklyn to intern for filmmaker Spike Lee. An unpaid film editing internship was not on the usual list of "what Indian kids do after college", but our parents supported her, and as she worked her way up in the film industry, her career blossomed. She settled in Brooklyn and established herself as an accomplished film editor, working with Spike Lee and other directors, and eventually finding a niche in documentary film. She faced challenges in it being a male dominated, predominantly white industry, but persistence and hard work ultimately paid off.

But we were also allowed to do things our non-desi friends did, and in the eyes of some people, this meant we were running wild. In fact, we were learning to navigate the world outside the shelter of family and community, to see for ourselves the many ways we could defy the limits that people set for us and fight the injustices we saw in that larger world. At one Marathi conference, a group of us joked about starting a support group called "Non-Doctors Anonymous" for the artists, social workers and activists. We didn't see our paths as predestined or our choices as limited, but we also didn't see ourselves reflected anywhere in popular culture or in careers outside the traditional paths we were encouraged to pursue.

Jumping back across the country, after Hawai'i, Phil and I decided to do our final co-op together in Alaska. It was meant to be a three month stint, but I got a summer job offer and we returned to one of the sunniest summers in anyone's memory. We were sold. We soon acquired a Subaru, a puppy and kitten, and a place to live, in that order, and 27 years later, we're still here. Alaska is a wonderful place to live, with rugged outdoor beauty and adventure right at your door. It's hard to be far from family, but we like to think of ourselves as immigrants continuing the journey.

Phil went into criminal defense, and my job at a small estate planning firm eventually led to a practice of my own. After we got married and had our son Kiran in 2003, self-employment was a real blessing, allowing me to control my schedule to spend time with our boy and the activities I loved, like rock climbing and hiking. Then I learned that the probate judge I most often appeared in front of was retiring. We had always joked that I'd replace him one day, and now he invited me to do so for real. I became a magistrate judge in 2013, and although I was sad to give up my practice and clients, the challenge of being on the bench more than made up for it. Magistrate judges are the emergency

room of state courts, and I handled a variety of whatever issues walked through the courthouse doors.

Geeta, now a full-fledged New Yorker with a husband and two sons, continued to win critical acclaim in her field, collecting four Emmys, several more nominations, and two trips to the Oscars for her work on Music By Prudence, a short documentary that won an Academy Award in 2007 and another short that was nominated. People in our community stopped telling their kids to go to medical school and started telling them to win Oscars. She transitioned from editing to directing and was accepted into the Academy of Motion Picture Arts and Sciences. and the Directors Guild of America's. She continues to support the work of women and people of color who pursue careers in film while pursuing her own projects. Her focus on social justice issues have led her to work alongside Sam Pollard, Whoopi Goldberg, Alex Gibney and Steven Spielberg.

Back in Alaska, it took me three tries to get through the grueling process of applying to be a Superior Court judge - a survey of professionals and the public, an interview with a council of lawyers and non-lawyers, a public hearing, and finally an interview with the Governor. In July 2018, I was appointed to my current position, the first woman of color appointed to the Superior Court in this state. The Superior Court in Alaska is a court of general jurisdiction, able to hear every type of case that can be brought in state court. I handle divorces, children's services cases, criminal matters, and civil lawsuits, as well as estates, guardianships and adoptions - the area in which I began my law practice. Every day I come to work and put on a black robe, I feel humbled and honored to serve the public.

We three siblings remain very close, and Ashwin (no doubt influenced by his bossy older sisters) is an amazing, accomplished person in his own right. Geeta and I, as some of the oldest first generation kids and as girls, faced all our challenges together, inspired by the many strong women in our lives, like our mother - a doctor, dancer, writer and world traveler - but also by men like our father, who respected us enough to push us and held us to the highest standards. Now that we are parents ourselves, it's easier to understand our own parents' worries and hopes for us; no doubt our children will push us in the same way we pushed our parents. Every generation, after all, are immigrants traveling into the future.

# सुभाषिते

- वैजयंती जोशी

|| श्री ||

सर्वप्रथम, स्त्री-सशक्तीकरण (Women Empowerment) ह्या विषयावर स्त्री आणि लेखिका ह्या दोन्ही नात्यांनी विचार मांडण्याची सुवर्णसंधी, संस्कृत सुभाषितांच्या मालिकेतील ह्या तृतीय पुष्पाद्वारे, दिल्याबद्दल मी अनुबंधच्या कार्यकारी समितीचे आभार मानते !

सृष्टीकर्त्यांनी, जन्म, संगोपन आणि वंशवृद्धीची सगळ्यात महत्वाची आणि तेवढीच नाजूक जबाबदारी, जिच्याकडे सोपवली आहे, त्या स्त्रीला वेगळ्या सशक्तीकरणाची गरज पडावी हा एक दैवदुर्विलासच म्हणावा लागेल. पण सूर्य-चंद्र ह्यांना पण जसं ग्रहण चुकवता येत नाही तसेच काहीसं, संपूर्ण स्त्रीजातीचं मध्ययुगीन काळापासून झालेलं आहे.

खरं तर; अतिशयोक्ती नाही करायची म्हटली तरी स्त्रियांना सर्वगुणसंपन्नच म्हणावं लागेल. दया, क्षमा, त्याग, चिकाटी, कमालीची सहनशीलता, कुटुंबाला एकत्र सांधून ठेवण्याची खुबी, जन्मजात व्यवहार दक्षता, अंगभूत मनकवडेपणा, हरहुन्नरीपणा, सौंदर्यदृष्टी, संवेदनशीलता हे तर सर्व स्त्रियांचे मूलभूत गुण आहेत. आणि ह्या गुणांचा अतिशय उत्तम उपयोग करून त्या, कुटुंबातील आणि त्यांच्या आजूबाजूच्या सर्व व्यक्तींचे दैनंदिन जीवन सुखकर, निरामय आणि आनंदी व्हावे ह्या साठी सतत झटत असतात. पण, इतके परोपकारी गुण असून सुद्धा त्यांना अनेकदा गृहीत धरल्या जातं, अबला म्हटल्या जातं, त्यांच्यावर अन्याय केले जातात. पुरुषप्रधान संस्कृती, स्त्री शिक्षणाची वंचना, अर्थार्जनाच्या संधींची वानवा अशा आणि इतर बऱ्याच सामाजिक कारणांमुळे, स्त्रियांना दुय्यम दर्जा स्वीकारावा लागतो.

पण आपल्या इतिहासात अशा अनेक महान स्त्रियांची उदाहरणे आहेत ज्यांनी आजच्या स्त्री साठी जणू काही Women Empowerment चे धडेच घालून दिले आहेत. ह्या स्त्रियांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीला सामोरं जाऊन स्वतःसाठी वेगळी वाटचाल निवडली आणि यशाची शिखरे काबीज केली. आजकाल स्त्रियांना ज्या विविध अडचणींना तोंड द्यावे लागते त्यापेक्षाही कठीण परिस्थितीवर त्यांनी मात केली. प्रखर बुद्धिमत्ता, राजनैतिक दूरदृष्टी, खंबीर व्यक्तीमत्व, प्रभावी रणनिती, पराक्रमी रणकौशल्य, प्रशासकीय निपुणता अशा विविध गुणांनी संपन्न असलेल्या ह्या स्त्रियांनी नेतृत्वाचे नवीन पाठ गिरवले आणि इतिहासाला कलाटणी दिली.

उदाहरणंच द्यायची झाली तर; पौराणिक काळातील अरुंधती, अनुसूया, लोपामुद्रा, घोषा, गार्गी, मैत्रेयी इत्यादी. ह्या स्त्रियांना ब्रम्हवादिनी म्हणत असत कारण पूर्वीच्या पुरुषवर्गाप्रमाणे त्यासुद्धा वेद आणि वेदांगांमध्ये पारंगत होत्या. मध्ययुगीन काळातील; संत मीराबाई, संत मुक्ताबाई, संत जनाबाई इत्यादी, ज्या स्वतः परमार्थात परमोच्च स्थितीला पोहोचल्या होत्या आणि ज्यांनी इतरांनाही भगवत्प्राप्तीच्या सदमार्गाला लावले.
गेल्या सातशे-आठशे वर्षातील उदाहरणे बघितली तर; राजमाता जिजाबाई, महाराणी येसूबाई, महाराणी ताराबाई, राणी लक्ष्मीबाई, कित्तूरची चेन्नमा, अहिल्यादेवी होळकर ह्या स्त्रियांनी मुघल आणि ब्रिटिश सरकारांविरुद्ध लढे दिले. मागल्या शतकातील डॉक्टर आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे, डॉक्टर सरोजिनी नायडू, सावित्रीबाई फुले, कलाक्षेत्रच्या रुक्मिणी देवी अरुंडेल ह्यांनी शिक्षण, समाजकारण, कला, ह्या क्षेत्रांमध्ये स्वतःबरोबर अन्य स्त्रियांसाठीही नवीन मार्ग खुले केले. आणि अगदी आधुनिक काळात इंद्रा नूयी, मंगळयानच्या सर्व स्त्रीवैज्ञानिक, निर्मला सीतारामन,

IMF च्या chief economist गीता गोपीनाथ इत्यादींनी तर पुरुषांपेक्षाही भव्य कामगिरी केली. अशी कितीही नावे घेतली तरी कमीच आहेत !

भारतीय जनमानसामध्ये स्त्री आणि तिचे महत्व अनादिकालापासून आहे. शक्तीच्या स्वरूपात, देवीच्या स्वरूपात तिची नित्य पूजा होते आणि त्याचेच प्रतिबिंब संस्कृत साहित्यातील अनेक सुभाषितांमध्ये दिसते. स्त्रियांच्या विविध गुणांचे आणि त्यांच्या समाजातील महत्वाचे गुणगान ह्या सुभाषितांच्या माध्यमातून गायले आहे.

भारतीय समाजाचे वागणे ह्या सुभाषितांच्या अनुसरून कधीच नव्हते असेही मानणारी एक विचारधारा आहे. पण आपण मात्र, नवीन पिढीतील स्त्रीला स्वतःच्या शक्तीची आणि पुरुषांना त्यांच्या स्त्रीबद्दल असलेल्या कर्तव्याची जाणीव होईल अशी आशा करतच ह्या काही सुभाषितांचे रसग्रहण करूया !

१. सर्वमङ्गलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यम्बके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ॥

**अर्थ:** हे माते, सर्व प्रकारचे मंगल प्रदान करणारी, कल्याणकारी, सगळ्या मनोरथांना पूर्ण करणारी, अशी तूच शरण जाण्यायोग्य आहेस. तुझ्या तीन नेत्रांनी तूच भूत, भविष्य आणि वर्तमान प्रत्यक्ष बघू शकतेस. तूच शिवपत्नी आहेस, तूच नारायणपत्नी आहेस, म्हणजेच परमात्म्याच्या सर्व स्वरुपांशी तूच संलग्न आहेस. तुला माझा नमस्कार !

२. यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः ।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वास्तत्राफलाः क्रियाः ॥

**अर्थ:** जिथे स्त्रियांबद्दल आदर आणि आदर असतो, त्यांच्या गरजा आणि अपेक्षा पूर्ण केल्या जातात, त्या ठिकाणी देव, समाज आणि कुटुंब आनंदी असतात. जिथे असे होत नाही आणि त्यांचा तिरस्कार केला जातो, तिथे देवकृपा राहत नाही आणि तेथे केलेले कुठलेही कार्य यशस्वी होत नाही.

३. राष्ट्र स्य श्व: नारी अस्ति, नारी राष्ट्र स्य अक्शि अस्ति |
नारी अस्य समाजस्य कुशलवास्तुकारा अस्ति, नारीशक्ति शक्तिशाली समाजस्य निर्माणं करोति ||

**अर्थ:** स्त्री ही आमचे भविष्य आहे. स्त्री म्हणजेच राष्ट्राचा डोळा आहे. स्त्री ही समाजाची परिपूर्ण शिल्पकार आहे. स्त्री सशक्तीकरणच समाज सक्षम बनवू शकते.

४. अर्धं भार्या मनुष्यस्य ,भार्या श्रेष्ठतम: सखा |
भार्या मूलं त्रिवर्गस्य,भार्या मूलं तरिष्यत: ||

**अर्थ:** पत्नी हे पुरुषाचे अर्धांग होय. पत्नी हा सर्वश्रेष्ठ मित्र आहे. पत्नी हे तीन अर्थ साधण्याचे मूळ होय. पत्नी हे संसाररुपी सागर तरुन जाण्याचे मूळ आहे.

**५.** उपाध्यायात् दश आचार्य: आचार्याणां शतं पिता |
सहस्त्रं तु पितृन् माता गौरवेण अतिरिच्यते ||

**अर्थ:** उपाध्यायापेक्षा आचार्य दसपट श्रेष्ठ आहे. पिता हा शंभर आचार्याएवढा थोर आहे आणि माता ही पित्यापेक्षा हजारपटीहून अधिक श्रेष्ठ आहे.

**६.** कुपुत्रो जायेत क्वचित् अपि कुमाता न भवति |

**अर्थ:** कदाचित एकवेळ पुत्र वाईट निघु शकेल पण वाईट माता कधीही होणार नाही !

**७.** स्त्रीणां अशिक्षितपटुत्वम् अमानुषीषु |
संदृश्यते किमुत:या:प्रतिबोधवत्य: ||

**अर्थ:** मनुष्येतर प्राण्यांमधील स्त्रियांमध्ये न शिकवताच आलेले (उपजतच) चातुर्य दिसून येते. तर मग ज्या मानव जातीतील स्त्रिया ज्यांना शिक्षण मिळालेले असते. त्या (कुशल) स्त्रियांबद्दल काय सांगावे.?

**८.** अहिल्या, द्रोपदी, सीता, तारा, मंदोदरी तथा |
पंचकन्या स्मरे नित्यं महापातक नाशनम ||

**अर्थ:** गौतम ऋषींची पत्नी अहिल्या, पांडवांची पत्नी द्रौपदी, प्रभु रामचंद्रांची पत्नी सीता, राजा हरिश्चन्द्राची पत्नी तारामती व रावणाची पत्नी मंदोदरी, ह्या पाच कन्यांचे जो स्मरण करेल, त्याचे महापातक नष्ट होईल.
वर नमूद केलेल्या पाचही स्त्रिया अत्यंत अद्वितीय आणि विशेष आहेत, त्यांची कथा रामायण आणि महाभारतामध्ये मध्यवर्ती आहे.

*(वैजयंती जोशी ह्या मराठी स्फुट लेखन करतात. साहित्याची मनापासून असलेली आवड आणि चौफेर वाचन ह्या दोन्ही गोष्टी त्यांना लेखनाकरिता मदत करतात. मायमराठीतील आद्य ग्रंथ श्री ज्ञानेश्वरी आणि संतवाग्मय हे त्यांचे विशेष जिव्हाळ्याचे विषय आहेत. गीर्वाणभारती संस्कृतमधील शास्त्रे आणि साहित्य ह्यांचापण त्या फावल्या वेळात अभ्यास करतात. व्यवसायाने त्या Software Architect आहेत आणि Boston जवळील उपनगरात राहतात.)*

# कथा

## उमरकैद !!

- विद्या भुतकर

जयी आज संध्याकाळी वकील सायबांच्या दारात पोचली. त्यांची अजून काही कामं चालली होती आणि लोकं आहेत म्हणाल्यावर ती मागच्या दाराने वकिलीण बाईंकडे आली. ३५-३८ वर्षांची जया त्यांच्या शेतात कामाला यायची. कधी कधी त्यांच्या घरीही काही काम पडलं तर येऊन करून जायची. तिचा नवरा मुंबईला गवंड्याचं काम करायचा. दोन-चार महिन्यातून एकदा यायचा, चार पैसे देऊन जायचा.
तिला आज पाहून बाईंनी विचारलं, "काय गं नवरा येणार होता ना परवा तुझा? आज इकडं कशी काय? परत गेलेला दिसतोय?".
"नायी हाय इथंच अजून. सायेबाना इचारायचं हाय जरा.", घाबरूनच बोलत होती बिचारी.
"त्यांचं काम चालू आहे. येतील बस जरा. सांग काय झालं?", बाईंनी विचारलं.
"परवा 'ते' घरी येणार व्हतं. 'ते' कसलं, मुडदा बशिवला त्येचा", तिला राग अनावर झाला होता.
"तर मी कामावरून घरी आलो तर हा आलेला हुता. घरात आलो तर कोपऱ्यात एक बाई बसली व्हती. "
"बाई?", जरा घाबरून बाईंनी विचारलं.

तर झालं असं होतं...
विकास आणि जयाचं लग्न होऊन १५-२० वर्षं झालेली. एक मुलगाही होता त्यांना, १५ वर्षांचा, अर्जुन नाव त्याचं. विकासराव शहरात असले की हे माय-लेक दोघंच घरात. त्यामुळे त्याला तशी आईच्या कष्टाची जाणीव होती. दर २-४ महिन्यात विकास दोन दिवस भेटायला येत असे. पोरालाही तेव्हढंच बापाचं तोंड पाहिल्यासारखं वाटायचं. यावेळी मात्र काहीतरी वेगळं घडलं. शुक्रवारी रात्री विकासराव घरी आले, ते एका २०-२५ वर्षांच्या मुलीसोबतच. थोड्या वेळात कामावरून जयी घरी आली तर एकदम शंकेने त्या मुलीकडे बघायला लागली.
"ही कोन?", तिने बारीक डोळे करून विचारले.
"सांगतो जरा येळात, बस आत्ताच आलियास.', त्याने खोट्या रागाने तिला सांगितलं.
'आता याला कधीपासून माजी काळजी पडली', ती मनातल्या मनात विचार करत होती.
'कधी फोन बी येळेत करत नायी तर कधी पैका पाठवत नायी. आनी म्हनं बस.', विचार करत ती मोरीत गेली.

जयीने हात, पाय धुतले आणि जेवण बनवायला लागली. तिला घोळ वाटत होता. तिने पटापटा चार भाकरी टाकल्या आणि कालवण केलं. सगळ्यांना जेवायला दिलं तरी तिला जेवण जाईना. ती बाई, बाई कुठली पोरगीच होती, गप्पच होती तीही आणि जरा घाबरलेली. जेवण झाल्यावर तिने पोराला बाहेर पाठवला आणि ती त्याच्याशी बोलायला बसली.

"माझ्या खोलीच्या शेजारी राहतो एक आन्ना. त्याची पोरगी हाय. गेल्या वरशी माह्येरी आली, नवरा गेला म्हून. तवापास्न बापाकड हाय. वस्ती बी चांगली न्हाय तिथ. म्हनला लगीन करा हिच्याशी. लई माग लागला हुता, सा महिनं झालं. म्हनलं आर माझी बायको, पोर सगळी हाय गावाकडं. असं काय जमनार नाय मला. तर म्हनला इथं एकलाच राहता खोलीवर, करंल तुमचं सगळं. पन पोरगी चांगली हाय. चार घरी काम करून पैसा मिळवते. बापाला बी बगते.", विकास बोलायला लागला होता.

शहरात आन्नाची आणि विकासची मैत्री चांगलीच जमली होती. त्याची पोरगी परत आली तेंव्हा आन्ना काळजीत बोलायचा त्याच्याशी. त्याचीही नजर होतीच

तिच्यावर. असंही एकट्याने किती वर्षं काढायची. गावाकडे जायचं तरी आता तिकडे मन रमायचं नाही. जयी होतीच, पण इतके वर्षं असं वेगळं राहिल्यावर प्रेम काय असणार ते. तिची त्याच्यावर किती भक्ती आहे ते त्याला माहित होतं आणि असंही दुसरं कोणी त्याचं असं कुणी नव्हतं. पण ही पोरगी पाहिल्यापासून त्याचं मन बदललं होतं. तिच्या बापाने जरा थोडा आग्रह केल्यावर त्यानेही 'हो' म्हणून सांगितलं.

शंका असणं गोष्ट वेगळी आणि प्रत्यक्षात ते पाहणं यात खूप फरक असतो, नाही का. खरंच हा दुसऱ्या बाईला घरी येऊन आला म्हणाल्यावर जयी रागाने थरथरायला लागली.
"तुलाच कसा पकडला बापान तिच्या? दुसरी लोकं मेलीत का त्या शेरात इतक्या मोट्या? तरी म्हनलं याला काय आजकल पोराची बायकोची आठवन येन नाय ती. ", जयी बोलली.
तिला असं तावात पाहून त्याने तिला पाणी दिलं, तो म्हणाला, 'शांत हो!'.
तिकडे हिचा त्रागा बघून मुलगी अजूनच घाबरली होती.
"अगं ऐक तरी जरा. प्रगती नाव हाय तिचं. तिथं राह्यचं म्हंजे तरी काय सोप्पं हाय का? बाकी लोक चोरून करत्यात मी तिला घेऊन आलो. ", तो हिमतीनं बोलला.
"मग मी काय करावं? काय सांगू नका मला. ही असली कामं करायला जाताय व्हय तिकडं. मरू दे तो पैका, गप हितं शेतात जावा माझ्याबर. ", तिने जरा दमाने सांगायचा प्रयत्न केला.
"अग पन हिचं काय? तिकडं मी नसतो तर बाकी हुतेच त्रास द्यायला तिला. मला काय माहीत नाय, मी तिच्या बापाला शब्द दिलाय. आन लैच तरास होत असंल तर मी जातोच निघून. बस मग एकलीच. " त्याने एकदम निर्णय सांगितला आणि बाहेर निघून गेला. बायको रागावणार हे तर त्याला माहितच होतं. पण शेवटी तो इतक्या वर्षाचा नवरा तिचा. करून करून काय करणार होती ती?

जयीला काही सुचेना. इतक्या वर्षांचा तिचा नवरा आणि ते पोरगं हेच काय ते तिचं जग. पैसा नसला तरी हे दोन लोक पुरेसे होते तिला. बाकी काही नसलं तरी चालणार होतं. त्याच्याशी भांडणार होती पण खरंच त्या पोरीबर निघून गेला तो तर? तिला या विचाराने काही सुचेना.

ती त्या पोरीकडे वळली. "काय गं, तुला दुसरा कोनी मिळाला नाही का? असं भोळ्या लोकांना फ़सवतिस व्हय?"
ती तरी काय बोलणार होती? ती स्वतःच घाबरलेली होती. एकतर तिकडे विधवा झाल्यावर सासरी त्रास व्हायला लागला म्हणून बापाकड गेली तरी त्रास काही कमी होत नव्हता. आयुष्य एकटं काढायचं का जीव द्यायचा या दोन विचारात अडकली होती. विकास ४०चा असला तरी बरा होता, निदान वस्तीतल्या बाकी लोकांपेक्षा बरा म्हणून तिने नाईलाजाने होकार दिला. एका छोट्या देवळात जाऊन त्याने दोन काळे मणी तिच्या गळ्यात घातले आणि खोलीवर घेऊन आला. चार महिने झाले तरी त्याची हिम्मत झाली नव्हती घरी जायची. पोरानं फोन केल्यावर मात्र त्याचा नाईलाज झाला. किती वर्षं असं लपवून ठेवायचं त्यापेक्षा 'जे होईल ते' म्हणून तो तिला घेऊन घरी आला होता.

ती म्हणाली, "ताई असं चिडू नका हो. मला काय बी सांगता येनार नाही. तरून विधवा होन्यापेक्षा मरन बरं, असं चाललं हुतं माझं. बापानं यांच्या मागं आग्रह केला. मी तरी किती नाय म्हननार. एकतर असं त्याच्या गळ्यात येउन पडलो परत, किती दिवस त्याला तरास देनार? विलासराव म्हनलं तवा मना करता यिना. तुमाला तरास द्यायचा नाय मला. "
जयीला काय करावं कळेना. ती 'भैनिकड जातो' म्हणून निघून गेली. पावलं जड झाली होती. अर्धा तास चालून ती बहिणीकडे पोचली. तिच्याकडे जाऊन एकदम गळ्यातच पडली. अशी रात्रीची तिला आलेली पाहून बहीणही घाबरली होती. जयीने घरात घडलेलं सर्व घडाघडा सांगायला सुरुवात केली.

तिला बहिणीने शांत केले, समजावले, म्हणाली, "हे बघ उगाच लई घाई करू नकोस. शेवटी मानुसच तो, वाकडा जानारच. पन तू तुझा इचार कर. तू काय अशीच काडीमोड दिऊन रह्शील काय? पोराला शिकवायचं हाय, त्याचं लगीन करायचं, उद्या त्याला कोन पोरगी दील? तिकडं ती बाई काय करती याचं तुला काय? चार महिण्यात एकदा येतोय त्यो. पैसा पाठवून तरी दील ना? मरू दे तिला मग. "

बहिणीने असं सांगितल्यावर तिला वाटायला लागलं की आपणच इतका बाऊ करत आहोत का. रात्रभर ती तिथेच राहिली. सकाळी उठून घरी परतली. तिला

जिवंत बघून विकासनं मोठा श्वास घेतला. 'निदान जीव तरी देत नाही म्हणजे येईल जागेवर' असा विचार करून त्याच्या जीवात जीव आला. नाहीतर, 'कुठल्या विहिरीत सापडते कि काय' अशी त्याला भीती वाटली होती. तिने घरी येऊन डोक्यावरून भराभरा पाणी ओतलं आणि कामाला निघून गेली. नवऱ्याचे केस उपटून काढावे तशा आवेशात तिने तण उपटून काढलं. दिवस संपला तशा तिच्या भावनाही उतरत चालल्या होत्या. बहिण म्हणते ते बरोबर आहे असं तिला वाटायला लागलं होतं. 'चार महिन्यातून एकदा तो येणार, बाकी तिकडे काय चालतंय त्याचं आपल्याला काय?', असा विचार करू लागली. 'लगेच चांगलं वागायची गरज नाही पण भांडण करायला नको', असं तिने मनोमन ठरवलं. कामाचे पैसे घेऊन ती घरी आली आणि कालचे कपडे धुवायला लागली.

तेव्हढ्यात तिला विकास घरी परत येताना दिसला. मित्राशी बोलून घरी परत येत होता. त्याला असा निवांत बघून तिला खूप संताप झाला. सगळं आयुष्य तिच्यासमोर उभं राहिलं. पोराचा चेहरा आठवला. त्याच्या परस्पर गावात काढलेले एकटे दिवस आठवले. आणि तिचा संताप अनावर झाला. तो घरात आला तशी ती उठली, हातातलं धोपाटन घेऊन त्याला जोरजोरात मारायला सुरवात केली. त्याने आवरायचा प्रयत्न केला पण तिच्या अंगात आलं होतं. तिला आवरणं त्याला जमेना. तिचा मार वाढला तसा तो आरडायला लागला. ती पोरगीही आतून पळत आली.
"अगं का मारतीय? येडी-बिडी झालीस कि काय? मी तुझा नवरा हाय. जये जाग्येवर ये.", विकास ओरडत होता.

जयी बोलतच राहिली, "तुला लई पुळका आला व्हय तिचा. एव्हढंच वाटत होतं तर भैन म्हनून आणायचं हुतास. एकटी बाई दिसली की लगेच नजर वाकडी झालि काय तुजी? मी हीतं तुझ्या पोराला मोटा करतोय. मला काय त्येच काम हाय व्हय. लांब राह्यलो तरी कुनाला हात लावू दिला नाही. तू मातर लगीच तयार झालास सोडून जाया. बाईचा जनमच वाईट. सीतेसारखा एकट्याने काडला तरी शेवटी मातीतंच जायचं तिला."

विकासने मधेच जयीला एक फटका दिलाच. ती जरा कळवळली, पण थांबली नाही. तिकडे ती मुलगीही बघतच होती यांचं भांडण. तो जयीला जड जायला लागला आहे हे पाहून असं पाहून ती पोरगी तिच्या मदतीला धावली. आपल्यावर पडलेली प्रत्येक वाईट नजर तिला आठवली, सासरचे टोमणे आठवले आणि बापानं थोडक्यात आपल्याला असं सोडून दिलं 'दुसरी' म्हणून ते आठवलं. यानेही कधी नाही न म्हणता 'दुसरी' म्हणून घेऊन टाकलं. सगळ्या पुरुष जातीचा संताप कसा उफाळून आला. तिनेही एक दांडा उचलला आणि त्याला झोडायला सुरुवात केली. मार खाऊन तो पडून गेला तरी दोघींचं समाधान होत नव्हतं. पोरगा घरी आल्यावर त्याला रिक्षात घालून तिने नवऱ्याला 'पोलिसात घेऊन जा' म्हणाली.
त्याला म्हणाली, "हे बघ तूचाच आधार आता मला. 'आईवर, माझ्यावर हात उगारला त्यानं आन दुसरं लगीन बी करून आलाय. कम्प्लेन टाकायची हाय.' असं सांग पोलिसाला. मी आलोच वकील सायबाना घेऊन.

त्याला तिकडे धाडून ती वकीलसाहेबांकडे आली होती. बाईंनी तिला विचारलं, "अगं बाई. काय करतेयस हे असं. जिवंत आहे न तो? नीट विचार केलायस ना काय करायचं आहे ते? नाहीतर होत्याचं नव्हतं होऊन बसेल."

जयी बाईंना म्हणाली, "व्हय हाय जिवंत हाय. त्यो कुटला मरतोय. बाई, तुमास्नी सांगतो, लई संताप झाला तेच्यावर. इचार बी केला करू द्यावं त्याला पायजे ते. पन परत म्हनलं, त्याला मारून जन्मठेप झाली तरी चालल पन ही असली उमरकैद नको."

**तिचा निर्णय पक्का झाला होता !!**

# नारी तू नारायणी!!!

- मनिषा विरेंद्र तोडकर

(Fiction based on real story and characters around 1990)

लोणावळ्याच्या हिरव्यागार छोट्याश्या पहाडीवरून चकचकत्या मर्सडिस मध्ये बसून निर्सगरम्य वातावरणाचा आनंद घेत, जयश्री स्वतःच्या फार्म हाऊस वर निघाली होती. रस्त्यात एक नव्या जोडप्याला एकाच कपातून चहाचा आस्वाद घेताना बघून तिच्या डोळ्यासमोर भूतकाळ तरळू लागला.....

लग्न करून आले तेव्हा अवघ्या १५ की १६ वर्षांची असेल मी. ना आई, ना बाप. लहानपणीच वारले होते, त्यामुळे मोठया बहिणीने मला आणि तीन भांवडाना आई वडिला सारखे प्रेम दिले, लहानाचे मोठे केले. थोडी मोठी झाले की तिने मग अशोक बरोबर लग्न करून दिले. अशोक म्हणजे माझा जीवलगा. अशोक पुण्यात रहणारा तसेच छान शिकलेला होता. परंतु शिक्षण त्याने स्वतःच्या हिमतीवर केले होते. त्याच्या आई वडिलांची परिस्थिती बेताचीच होती, त्यांचे स्वतःचे शिक्षण काही झालेले नसल्याने ते अशोकला ही शिकवू शकत नव्हते. त्याकाळी असेही शिक्षणाला एवढं महत्त्व पण नव्हते, खूप कमी लोक शिकलेले, सवरलेले असायचे. सासू सासऱ्यांना मी आई बाबा संबोधत होते. बिचाऱ्यांनी शेतात मजूरी करून कसाबसा संसाराचा गाडा खेचून आणला होता. त्यात शिक्षण तर त्यांना परवडणारे नव्हते.

पण अशोक कमालीचा खटपटी, रोज सकाळचे पेपर टाकणे, किराणा मालाच्या दुकानात संध्याकाळी थोडा वेळ काम करणे अशी छोटी मोठी कामे करुन, त्याने पैसे कमाविले आणि मग त्यातून शाळा, कॉलेजची फी, पुस्तके असा शैक्षणिक खर्च, स्वतःच्या कमाईवर शिक्षण पूर्ण केले होते. स्वहिमती वर चांगल्या कंपनीत नोकरी पण मिळवली होती. तसेच स्वभावाने पण अत्यंत प्रेमळ आणि धाडसी वृतीच्या होता. त्यामुळेच माझ्या नशिबाचा सुर्य उदयास येणार होता. मला स्वप्नातही कल्पना नव्हती की माझे जीवन आता खूप बदलणार आहे.

अशोकचा नेहमी हट्ट असायचा की सगळया गोष्टी आपल्या बायकोला आल्याच पाहिजे. मी पण राजाची राणी त्याच्यासारखी जिद्दी होतेच. एखादी गोष्ट शिकायची म्हणञे शिकायचीच अशी चिकाटी अंगात होतीच तसेच उत्साह प्रचंड दांडगा होता....

माझे शिक्षण बेताचे झाले होते, पण लिहता, वाचता मात्र चांगले येत होतं.

पुण्यात आले संसार सुरु झाला सुरवातीचे दिवस असे भराभरा गेले. वर्षे सरली, चार गोजिरवाण्या मुली पण आल्या माझ्या संसारात.... घरातल्या जबाबदाऱ्या वाढत गेल्या होत्या, मुलींचे शिक्षण, कपडे असेच बरेच खर्च. अशोकचा पगारही मोजकाच होता, त्यात आम्ही सगळे मिळून आठजण आणि कमविणारा एकच. त्याची अशी इच्छा होती जसे त्यांचे जीवन खडतरपणे गेले तसे मुलींचे नको व्हायला म्हणुन. एक दिवशी तो मला म्हणाला, "जयश्री, माझ्या पगारावर घर चालविणे थोडसं अवघड आहे तर आपण असे करूया का, काहीतरी उद्योग, व्यवसाय सुरू करायचा का?". आपण शेती करावी अशी अशोकची लहानपणापासूनची इच्छा होती. कदाचित आई बाबांना सतत रानात राबताना बघून त्याचे मन दुखावले असेल, म्हणूनच शेताचा मालक म्हणून बघायची त्याची भावना मनात असेल. अशोकने खूप प्रेमाने माझा हात हातात घेतला आणि म्हणाला, "आपण शेत घेऊया का? तू करशील शेती? होशील ना शेतकरीण? जमेल ना तुला?", "मला तर ऑफिसला जावेच लागेल." त्याचा माझ्यावरचा विश्वास बघून खूप सुखावले होते मी. मी पण काही करू शकते ही भावना खूप आनंददायी होती. क्षणांचाही विचार न करता मी पण प्रेमाने मानेनच हुंकार दिला.

मग काय त्यासाठी थोडंसं कर्ज काढलं. पुण्यापासून तासभर दूर असलेल्या एका गावात छोटसं शेत विकत घेतले, जमीन तशी ओसाड होती त्यामुळे कमी भावात मिळाली. बाबांना तर शेतीची आवड होतीच त्यामुळे ते शेतात राहण्यासाठी उत्सुक होते. आईंनी मुलींची जबाबदारी स्वतःवर घेतली. मग काय मला तर खूपच

हुरूप आला, कामाचे असे छान विभाजन झाले होते, सर्वजण स्वखुशीने कामाला लागले. माझ्यावर तर खूप मोठी जबाबदारी येऊन पडली होती, 'हो ' तर म्हटले होते पण करायचे कसे?

काय लावायचे, कधी कोणते पिक घ्यायचे, खत-पाणी कसे करायचं, पिकांची कशी काळजी घ्यायची असे हजारो प्रश्नाचे काहूर आमच्या मनात माजले होते, हे सर्व मला शिकायचं होतं. सुरुवातीला या सगळ्या विषयावरची पुस्तके अशोक ने मला आणून दिली. मी पण मन लावून त्याचा अभ्यास सुरू केला.

मग श्रीगणेश असा केला की, गणेश डाळिंबाची बाग लावायचं ठरवलं.

जमिनीची मशागत करून घेणे आवश्यक होते, चांगल्या प्रकारची माती मागवून जमीन शेतीलायक बनवून घेतली. दिवस-रात्र एक करून एकदांची रोपे उभी झाली. बाबा तर होतेच मदतीला. आवश्यक ती सगळी कामे मी तिथे उभे राहून मजूरांच्या कडून करवून घेत होते. खरं पाहिले तर त्या काळात सर्वांनी स्त्रीयांना शेतात मजूर म्हणून काम करताना बघितले होते, पण मी शेतकरी बनले होते.

मला स्वतःचा खूप अभिमान वाटत होता. आजूबाजूच्या शेतकऱ्यांना आवडत नसायचं, की एक स्त्री असून मी शेतकऱ्यासारखे शेतातली सगळी कामे करत असायचे ते. बियाणं आणण्यापासून ते खत, पाणी घालणे असे सगळ्याची मी काळजी घेत होते. अगदी आपल्या मुलाप्रमाणे त्यांची देखरेख करत होते. एका बाजूला संसार चालवणे पण चालूच होते, घरी येऊन स्वयंपाक करणे, मुलींची देखभाल करणे. तसेच सकाळी लवकर उठून घरातील कामे, स्वयंपाक, पाणी उरकून शेताला जाण्यासाठी बस पकडणे. परत गावात आल्यावर पायी मैलभर चालून शेतात पोहोचणे, त्यामुळे थोडी थकून जायचे शरीराने, पण मनाने मी खूप मजबूत होते. बघता बघता एक छानशी डाळिंबाची बाग उभी झाली होती. डोळ्याचे पारणे फिटेल अशी सुंदर डाळिंब झाडावर लटकायला लागली. मनात आनंदचा मोर नाचू लागला, विश्वासच बसत नव्हता. अरे! ही आपलीच बाग आहे? आठवड्याभरात पीक बाजारात विकायला घेऊन गेलो की, थोडासा घर खर्चाला माझाही हातभार लागणार, अशोकला पण आर्थिक मदत होणार अशा विचारांनी उत्साहाच्या भरात रात्रभर झोपच लागली नाही. त्या रात्री शेतामध्ये पोहचते, तर काय सगळी डाळिंब कुचडलेल्या अवस्थतेत मातीत पडली होती, सगळी बाग उद्ध्वस्थ झालेली होती. बाबा डोक्याला हात लावून बसले होते मला बघून रडवेल्या आवाजात म्हणाले " अग! बघ ना, कुठून हा बैल उधळत आला, आणि हा हा म्हणता सगळी बाग उजाड करून गेला, मी काही नाही करु शकलो"...... त्यांच्या आवाजात जडपणा स्पष्ट जाणवत होता. त्या धक्क्याने माझ्या पायातले त्राणच गेले. पणआजूबाजूचे शेतकरी मात्र खांद्याला खांदा लावून हसत मज्जा बघत बसले होते, मी समजून गेले की काय झाले असेल, असे तर ध्यानी मनी पण नव्हते. मग, आता करणार तरी काय? काही सुचतच नव्हते, सगळा पैसा शेतात घातलेला. एवढे कष्ट, मुलींची, सर्वांची ओढाताण करून कसबस गाड ओढून आणले होते. मनातील सर्व स्वप्न बैलाच्या पायदळी कुचलली गेली होती आणि त्या विचारांनी माझे बांध फुटले. अचानक खांद्यावर कोणाचा तरी हात पडला मी मागे वळून पाहिले तर अशोकच होता. खंबीरपणे म्हणाला "जयश्री रडायचं नाही आणि हरायचं तर मुळीच नाही, उठ! परत कामाला लाग. "

अशोक चे हे बोलणे ऐकून धीर आला. निश्चय करून उठले की ह्यापेक्षाही सुंदर बाग पुन्हा तयार करायची. आणि फक्त पुरुषच शेती करू शकतो असे नाही तर स्त्रिया ही त्यांच्यापेक्षा ही जास्त चांगल्या प्रकारे शेती करू शकतात हे सिध्द करून दाखवायचे. एक मोठा श्वास घेऊन, नवीन योजनेसह मी कामाला लागले "बाग छोटी पण पीक मोठं. "

त्यासाठी काही दिवसांनी......

मी आजूबाजूच्या शेतकऱ्यांशी मैत्री करण्याचे ठरविले. मी त्यांच्या मुलांसाठी घरूनच काहीतरी पदार्थ बनवून घेऊन थेट त्यांच्या घरी पोहचले, मला पाहून ते बुचकळ्यात पडले. अरे! आपण ह्यांची बाग विस्कळित केली, तरी ह्या बाई बघा आपल्या मुलांसाठी खाऊ घेऊन आल्या त्याचे त्यांना कमालीचे कौतुक वाटले. त्याचबरोबर आश्चर्य ही वाटत होते. असाच शत्रूवर प्रेमाने विजय मिळवायचा असतो, हे माझ्या ताईने मला शिकवले होते. त्याचा अमल मी बरोबर वेळी केला.

मग हळूहळू त्याचा विश्वास संपादन करून त्याच्यांशी मैत्रीचे संबंध निर्माण केले, त्याच बरोबर त्यांना गणेश डाळीब त्यांच्या स्वतःच्या शेतात लावण्यासाठी तयार

केले, त्याचबरोबर त्यांना समजविले की जसे आपल्या शेताच्या आजूबाजूला चांगली पीके असतील तर आपल्याला उत्तम दर्जाचे पिक मिळते त्या मागचे शास्त्रीयकारण, म्हणजे पिकांचे फळलीनीकरण हा खूप महत्वाचा भाग असतो. ज्याप्रमाणे आपल्या मुलांच्या संगतीत चांगली मुले आली की आपली मुले चांगली बनतात व वाईट संगत मिळाली की वाईट बनतात त्या प्रमाणे पिकांचे पण असते. त्याप्रमाणे आपण सारखी व सारख्या दर्जाची पिके लावूया, जेणे करून त्याचा फायदा आपल्या सर्वांना होईल. माझे म्हणणे त्यांना तंतोतत पटले, लगेच संमती देऊन ते म्हणाले "ताई, तुम्ही म्हणाल तसेच आपण करू आता आमचे शेतं हे तुमचेचं समजा. "

त्याप्रमाणे मी सुद्धा त्याच्यांसाठी बियाण्याची व्यवस्था केली, जास्त प्रमाणात मालघेतल्याने बऱ्याच कमी दरात मिळाले.

माझे पराक्रम ऐकून अशोकने मला आनंदाने मिठीच मारली, मी अगदी लाजून चक्काचूर झाले

आता महत्वाचे म्हणजे आजूबाजूच्या शेतकऱ्याचा त्रास कमी झाला होता, ते आपल्या शेताची स्वतःचे शेत समजूनच काळजी घेऊ लागले होते. एखाद्या दिवशी जायला जमले नाही तरी काही चिंता नव्हती. . . अशा प्रकारे माझ्या जीवनातला हा पहिला विजय मिळाला होता.

पिक कमालीचे सुंदर झाले होते. एक एक डाळिंब हातात मावेना एवढे मोठे झाले होते. हे पाहून Export quality चा माल आहे असे अशोक चे म्हणणे पडले.

मालाची व्यवस्थित किंमत देणारा व्यापारी पाहिजे होता. तसा व्यापारी शोधण्यासाठी मी मार्केट यार्ड मध्ये जाऊन खूप व्यापाऱ्याशी संपर्क साधला व ते मालाची गुणवत्ता बघून हातोहात माल घेण्यास तयार झाले व नेहमीच असा माल मिळणार असेल तर तुमच्याकडूनच माल घेऊ अशी हमी पण दिली. माझ्या डोक्यात लगेच विचार चमकून गेला की हे लगेच माल घेण्यास तयार आहे तर "हा माल कुठे विकणार?" मी उत्सुके पोटी विचारले त्यावर त्यांनी सांगितले "ताई, आम्ही हा माल निर्यात करणार. "

मग माझे विचार त्या दिशेने उडू लागले की आपण बनविलेला माल आपण खतःच निर्यात केला तर?!!

ही गोष्ट मी अशोक च्या कानावर घातली. त्याचे डोळे खुशीने चमकले, एक उंच उडी मारून परत त्याने घट्ट कवटाळाले.

निर्यात कसे करायचे ह्याविषयी अशोकने बरीच माहिती गोळा केली आणि आपण आपला माल स्वतःच निर्यात करायचा त्या दिशेने जोराने काम सुरु झाले. त्याचा ऑफिसच्या साहेबांच्या ओळखीने आमचे काम सोईस्कर झाले. स्वतःची बाग, स्वतःच्या मालाचा एक्सपोर्ट व्यापार सुरु झाला.

त्यात शंकाच नव्हती की हा देवाचा आशीर्वाद होता, तसेच आमच्या सर्वांची अथाग मेहनत त्याच बरोबर बुद्धी, कौशल्य आणि अशोकचा माझ्यावरच्या विश्वास याचा संगम मिळून आमच्या जीवनाचा सूर्य हळूहळू आकाशात चमकू लागला. जशी गावात पोहचले त्या लागोलाग शेतकऱ्याची लाईन माझ्याकडे लागली. ते सर्वांचे एकच म्हणणे होते "ताई, तुम्ही जी योजना राबविली ती आम्हाला पण सांगा म्हणजे तुम्ही सांगाल, त्याप्रमाणे आम्ही करू आणि आमचा माल पण तुम्हीच विकत घ्या. " मला तर थोड्यावेळ काही कळालेच नाही, नंतर थोड्या वेळाने डोक्यात प्रकाश पडला ही युक्ती खूपच उत्तम होती.

अशोक आनंदाने वेडाच झाला, वर्ल्डकप जिंकल्या सारखे त्याने मला उचलले आणि घरभर आनंदाने नाचयला लागला, मुली आई त्याच्याकडे अंचबित होऊन बघतच राहिल्या.

खूप मोठी आव्हाहने मी स्वीकारली होती. घर, शेत, त्याच बरोबर नव्याने उभी केलेली बाजार पेठ, सर्व शेतकऱ्यांना बियाणे पोहचविणे, शेतात कोणते पिक कधी घ्यायचे ह्याचे सविस्तर आराखडे तयार केले. बाजार पेठेत कोणता माल कमी पडतो त्याप्रमाणे शेतात ते पिक लावण्यावर भर दिला. उत्पादन आणि विक्री स्वतःच करत असल्याने हा खूप मोठा फायदा आम्हाला मिळू लागला. गावातले सगळे शेतकरी त्यांचा माल आम्हालाच चांगल्या किमतीत विकत होते त्यामुळे त्यांनाही फायदाच फायदा होत होता.

माझ्या योजनेत शेतकऱ्यांची संख्या वाढतच होती. . . छोट्याशा घरातून मोठ्या बंगल्यात रुपांतर झाले होते. अशोक ने स्वतः चे ऑफिस घेतले होते. मुलींना उच्च दर्जाचे शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे केले.

जीवानाचे सार्थक झाल्यासारखे वाटते.

आज "जयश्री एक्सपोर्ट" मोठ्या कंपन्यात एक समजली जाते.

पुरुष म्हणून नवाजल्या जाणाऱ्या दोन्हीही व्यवसायात मी त्यांनाच सल्ले देत आहे. आणि माझा व्यवसाय पूर्ण इमानदारीने चालविला, त्याचा मला खूप अभिमान तर वाटतोच त्याबरोबर धन्यता वाटते. शून्यातून सगळे उभे केले. त्याचा आनंद काही शब्दात व्यक्त करताच येत नाही. स्वतःचा बंगला, नोकर, चाकर गाडी, करोडो रुपयांची जमिनी, अस बरचं काही. . .

सगळ आपण आपल्या हिमतीवर कमविले आणि ते पण पुरुषांच्या नावाने रजिस्टर झालेला शेती हया व्यवसायात एक स्त्री असून मी तो व्यवस्थित पणे चालवला, त्याचबरोबर गावकऱ्यांना पण शेती कशी करायची ते नुसते शिकवलेच नाही तर आणि त्याच्याकडून ते करवून पण घेतले

खरी धन्यता वाटते की आज गावामध्ये आपले नाव आदराने घेतले जाते.

बाबा नेहमी म्हणायचे स्त्री मातीचे पण सोने करू शकते.

*(मला सगळ्याच विषयांवर लिहायला आवडते. जे मनातून स्फुरते असे सर्वाधिक मनाला समधान मिळते असे सर्व प्रकारचे लिखाण मला आवडते त्यात कवितांचा पण समावेश होतो.)*



# Quarantine - Her quarantine realization!

- नेहा गांधी

आज पहाटे ४:३० चा अलार्म व्हायच्या आधीच तिला जाग आली होती. त्याला कारणही तसेच होते. रोज ऑफिसमध्ये ८ वाजता पोचणारी ती, पण आज ऑफिस मध्ये महत्वाची क्लायंट मीटिंग होती. त्यामुळे शार्प ७:३० ला पोचायचे होते. म्हणजे अर्धा पाऊण तास हातात मिळणार होता. त्या वेळात तिला मीटिंग सेटअप, document प्रिंटिंग आणि रिविजन करता येणार होती. ७:३० ला पोचायचे म्हणजे ६:३० ची ट्रेन पकडायची होती. त्या आधी स्वतःचे सगळे आवरून, घरातल्या सगळ्यांचे डबे भरून ६:१५ ला निघावे लागणार होते. तिने पटापट उठून स्वतःचे सगळे आवरले. नाश्त्याला टोमॅटो ऑम्लेट बनवायची तयारी केली. एकीकडे सॅलड चिरून दुसरीकडे पास्ता करायला घेतला. एकाला लंच ला पास्ता तर दुसऱ्याला सँडविच. मुलांच्या वॉटरबॅग्स भरून, त्यांचे डबे पॅक करेपर्यंत ५:४५ झाले. पोळी भाजीचा डब्बा अजून व्हायचा होताच. रात्रीच भाजी चिरून पीठ मळून ठेवले होते. त्यामुळे पोळी भाजी पटकन तयार झाली. ५. ४५ पासून मुलांना हाक मारता मारता शेवटी ६ वाजता मुले उठली. मुलांना ब्रश करून टोमॅटो ऑम्लेट खायला देऊन तिने ऑफिस चा लॅपटॉप, लंच भरून बॅग पॅक केली. आज लवकर जायचे असल्याने तिने स्वतःचा ब्रेकफास्ट हि पॅक करून घेतला. आता नवरा मुलांना आवरून स्कूल बस मध्ये बसवणार होता. ती लगबगीने मुलांना जवळ घेऊन पप्पी देऊन ऑफिसला जायला निघाली.

शार्प ६:३० ला ट्रेन च्या प्लॅटफॉर्म वर पोचली. नेहमीप्रमाणे ट्रेन ला खचाखच गर्दी होती, पण हि ट्रेन तिला सोडायची नव्हती. धक्के खात निर्धाराने ती आत शिरली. संध्याकाळी पुन्हा हेच चक्र. ५:१५ ची ट्रेन पकडून ६:१५ ला घरी पोचायचे. मुलांना एक्सटेंडेड केअर मधून घेऊन घरी यायचे. त्यांना खायला देऊन लगेच रात्रीच्या जेवणाला लागायचे. मधून मधून मुलांचा अभ्यास, कधी क्लास, कधी त्यांची भांडणे, रडारड ह्या गराड्यात दिवस कधी संपायचा ते कळायचेच नाही. सगळे आवरून रात्री ११ ला बिछान्यावर पडताना दररोज मनात विचार यायचा कशासाठी आणि कधीपर्यंत हे सगळं... वीकएंड पण असाच निघून जायचा. . कधी शॉपिंग, ग्रोसरी, पाहुणे, मुलांच्या परीक्षा, घरातली काम. . कशीतरी स्वतःची समजून घालून ती दिवस ढकलत होती. . पण मनात कायम वाटायचं कि मुलांना अजून वेळ द्यायला हवा, त्यांच्यासोबत बसून पट्टे, कॅरम खेळावे, कधी चित्रे काढावी, एकत्र गप्पा माराव्यात, नवऱ्यासोबत वेळ घालवावा, सगळ्या फॅमिली ने एकत्र बसून मुव्ही बघावे, गाणी ऐकावी आणि कधी कधी नुसताच आराम करावा.

एके दिवशी अशीच नेहमीप्रमाणे बाहेर पडली. जानेवारी महिन्यातला २रा आठवडा असेल. ट्रेनमध्ये ती नेहमी न्युज बघायची. आज सगळ्या न्युज चॅनेल वर एकाच चर्चा होती... कोरोनाव्हायरसची.. चीन मध्ये एक नवीन व्हायरस डिटेक्ट झाला होता. खूप स्पीड ने पसरत होता. death toll खूपच जास्त होता. इटलीपासून अमेरिकेपर्यंत सगळे देश पॅनिक झाले होते. तिने लगेच न्युज चॅनेल ला subscribe केले. आता तिला दररोज ह्या न्यूज बघता येणार होत्या.

दररोज ऑफिस पासून ट्रेन मध्ये आणि सोसायटी पासून घरापर्यंत एकाच चर्चा होती. ती जवळ जवळ दररोज नवीन व्हायरस ची प्रोग्रेस ट्रॅक करत होती. मार्च महिना आला तरी चीन चे नंबर कमी झाले नव्हते. उलट इटली, स्पेन आणि अमेरिकेचे नंबर वाढू लागले होते. सगळ्या देशांनी emergency declare केली होती आणि पूर्ण लॉकडाऊन केले होते. आता हा ग्लोबल प्रॉब्लेम झाला होता. इंडियात अजून फक्त सिंगल-डिजिट नंबर्स होते, पण मोदींच्या अधिपत्याखाली निर्णय लवकरच घ्यायचे ठरले, आणि इंडिया मध्ये लॉकडाऊन झाले. स्कूल बंद झाली, ऑफिसेस ने वर्क फ्रॉम होम करायला सांगितले. एवढाच काय तर Mumbai ची lifeline local ट्रेन सुद्धा बंद करण्यात आली.

सुरुवातीला चुकल्या चुकल्या सारखा वाटलं. घरात कोंडल्यासारखं वाटलं. मुले कंटाळली. ऑफिसच काम कमी असल्यामुळे काहीतरी मिसिंग वाटू लागलं. एका

आठवड्याने मग हळू हळू सगळे नवीन रुटीन ला सरावले. तिला तर हे नवीन रुटीन फारच आवडू लागले. तिला अगदी हवं होत तास झालं.. आता मुलांना लवकर उठायला नको.. मुलं अगदी आरामात उठू लागली... सकाळी सगळे जण एकत्र योगा करून मग एकत्रच ब्रेकफास्ट घेऊ लागले.. कुठेही जायची कोणालाच घाई नाही.. त्यामुळे एकमेकांसाठी निवांत वेळ मिळू लागला.. नाही म्हटलं तरी कामवाली नसल्यामुळे तिचा बराचसा वेळ कामात जायचा, पण सगळे जण मदत करायचे.. मुळात सगळे एकत्र असल्याने कामांचे ओझे किंवा दडपण वाटत नव्हते... दररोज दुपारी ती आणि मुले वेगवेगळे खेळ खेळू लागले.. कधी कॅरम, कधी पत्ते, कधी भेंड्या तर कधी बॅट, बॉल... सकाळचा निवांत चहा, मग दुपारचे जेवण घेताना गप्पांच्या मैफिली जमू लागल्या. संध्याकाळचा चहा घेताना कधी कधी मित्रांचे विडिओ कॉल्स, आणि रात्रीच्या जेवण्याच्या वेळी एकमेकांची गम्मत, चेष्टा आणि मस्करी होऊ लागली... इतर वेळी ऑफिस/स्कूल ला जायच्या घाईत एकमेकांशी २ शब्दहि न बोलता येणारे सगळे तासंतास एकमेकांशी गप्पात रमू लागले. . एरवी कायम ऑफिस च्या कामाचे कॉल्स/इमेल्स मधून नि फोन मधून बाहेर न येणारे मुलांचे बाबाही मुलांशी छान हितगुज करू लागले. इतर वेळी गडबडीत कधी बाहेरून कधी बाईकडून पोळ्या करून घेणारी ती आता दररोज सगळ्यांच्या आवडीचे नवनवीन पदार्थ अगदी मन लावून करत होती.. मुलांचे किती लाड करू नि किती नको असे तिला झाले होते.. छान भरपूर झोप आणि आईबाबांचा सहवास मिळाल्यामुळे मुलांची चीडचीड आणि भांडणे खूपच कमी झाली होती.. त्यांच्यासोबत कधी चित्र काढताना किंवा पियानो वर नवीन गाणं शिकताना किंवा एखादी डान्स स्टेप शिकताना तिची तीच तिला नव्याने सापडू लागली...

इकडे लॉकडाऊन अजून एक्सटेन्ड झाला होत आणि तिला एक गोष्ट नव्याने उमगली होती.. आयुष्याच्या वाढलेल्या अपेक्षा पूर्ण करता करता आपण छोट्या छोट्या क्षणांमधून आयुष्य जगायला विसरूनच गेलोय.. quarantine करता करता ती जगायला शिकली आणि तिने ठरवलं कि हे कोरोना लॉकडाऊन जरी संपलं तरी 3 महिन्यातून किमान एका वीकएंड ला तरी फॅमिली quarantine करायचं, आणि कामांच्या आणि अपेक्षांच्या व्हायरस पासून ब्रेक घ्यायचा, रिचार्ज व्हायचं आणि पुन्हा नव्याने उभं राहायचं...

|| न्यू इंग्लंड मराठी मंडळ ||
New England Marathi Mandal

## मदतीची हाक

मंडळातर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमांना गरज आहे तुमच्या मदतीची , सहकार्याची, आणि सहभागाची.

नोंदणीसाठी कृपया संपर्क करा - http://nemm.org/index.php/requests/volunteer

***Student volunteering hours will be recongnized.

# मेहनत रंग लाती है...

- माधुरी अशिरगडे

आमच्या "तांदळा एक मुखवटा" या चित्रपटाचे शुटींग फलटणच्या वाड्यात सुरू होते. चित्रपटाच्या त्या सिक्वेन्समध्ये तुषार दळवी, आसावरी जोशी, प्रीती जोशी ही स्टारकास्ट होती. प्रसंग थोडा नाजुक होता. आसावरी जोशी ही चित्रपटाची नायिका, सोनसळा, तुषार दळवी, नवाब व प्रीती त्याची मानलेली बहीण/प्रेम पात्र ही तीन पात्र संबंधित. सोनसळेचा स्वप्नपुरुष नवाब, तिचा अधिकृत नवरा दिव्यांग, ती अस्पर्शित असते, तिला देवी मानतात लोक. एकदा स्वप्नात तिला नवाबाची विलक्षण ओढ वाटते व ती अपरात्री झोपेतून उठून नवाबाच्या शयन गृहाकडे निघते, तिला त्यांच्या कक्षात शिरण्याआधी थंड पाण्याने स्नान करून मग शिरायचे असे सूरकर(डायरेक्टर) यांनी सांगितले होते, गच्च भिजलेली आसावरी नवाबाच्या शयन कक्षात शिरते अन् मानलेल्या बहिणी बरोबर आपला स्वप्नपुरूष पाहून ती बिथरते असा साधारण प्रसंग होता. सूरकरांना अपेक्षित असा परिणाम काही केल्या मिळत नव्हता. त्यामुळे यांचे साधारण ४२ रिटेक्स झाले. संपूर्ण रात्रभर या दृश्याच्या चित्रीकरणात खर्ची पडली. बेचाळीस वेळा आसावरीला अंगावर पाणी घेऊन त्या शयनकक्षात शिरायचे कसा अभिनय करावा लागला. कारण रिटेक घ्यावा लागला की ओलेतेपण कमी व्हायचे. हवा तो परिणाम साधला जायचा नाही म्हणून पुन:पुन: तिला ओले होऊन यावे लागले. आम्हाला भिती वाटायला लागली की हिरॉईन आजारी नको पडायला. पण सूरकर आपल्या ट्रान्समध्ये होते. मनासारखा परिणाम जोवर मिळत नाही तोवर थांबणे माहीत नसते या पध्दतीच्या अवलियांना.

या चित्रपटाचे इफ्फी मध्ये सिलेक्शन झाले, बृहन महाराष्ट्र मंडळाच्या फिलाडेल्फिया येथील अधिवेशनात 'तांदळा एक मुखवटा' ला सेकंड बेस्ट फिल्मचा पुरस्कार मिळाला. मेहनतीचे केव्हा ना केव्हा चीज होत असते, फक्त सबुरी हवी व सोबतीने स्वत:वर विश्वास देखील.

**प्रसंग दुसरा**

तांदळाच्या क्लायमॅक्स चा प्रसंग होता. सवाई(उपेंद्र लिमये)नवाबाची हत्या करतो हा प्रसंग. उमेश कामत, उपेंद्र, आसावरी व तुषार दळवी ही स्टारकास्ट. सुरेश देशमाने कॅमेरामन होते. त्यांना एका उंच झाडावर बसवले होते. जर रिटेक्स झाले तर कॅमेरा व सिनेमॅटोग्राफर दोघांचंही काही खरं नव्हतं. झाड सडपातळ होतं. कॅमेरा व सिनेमॅटोग्राफर दोघंही केव्हा खाली येतील काही सांगता येत नव्हतं. इतका एक्सपेन्सिव्ह कॅमेरा पाण्यात गेला असता , हो कारण त्या झाडाखालून नदी वाहत होती. सगळे जीव पणाला लावून श्वास रोखून बसले होते. सवाई नवाबाच्या गळा सुऱ्याने कापतो तेव्हा रक्ताची चिळकांडी उडून आसावरीच्या/सोनसळे च्या कपाळावर उडते व भांगातून मग ते रक्त खाली ओघळते असा प्रसंग होता. सूरकर यांनी ऍक्शन म्हटले व उपेंद्रने ठरल्याप्रमाणे शॉट दिला. अन् काय आश्चर्य, आसावरीच्या कपाळावरून रक्ताचे ओघळ आले व चक्क शॉट ओके झाला. देशमानेंना घाईघाईने झाडावरून उतरविले तेव्हा सर्वांचाच जीव भांड्यात पडला. कधी कधी साध्या दृश्याला बेचाळीस रीटेक्स लागतात तर कधी अवघडदृश्याला एका झटक्यात ओके मिळते. काय गणित असेल याचे ते असो पण हे सगळं अतर्क्य आहे हे नक्की.

हा प्रसंग 'आईशप्पथ' या चित्रपटाच्या वेळचा आहे. उर्मिला कानेटकर, रिमा लागू करता तरूणपणातील भूमिका साकारत होती. प्रसंग असा होता की, अपरात्री मुलीचा जीव वाचविण्यासाठी उर्मिला पतीच्या घराबाहेर पडते , बाहेर मुसळधार पाऊस सुरू असतो. ती चिंब

भिजत भिजत वाट फुटेल तिकडे निघते. पावसाच्या फिलींग साठी फायर ब्रिगेडची गाडी बोलावली होती. शुटींग अर्ध्यात असताना फायर ब्रिगेडच्या टँकरमधील पाणी संपले. पुन्हा टँकर भरून आणायला चार तास लागणार होते. उर्मिलाला ओले गच्च दाखवायचे असल्यामुळे तिला कपडे पण बदलता येणार नव्हते. झाले ती चार तास थांबणार असे ठरले, सूरकर परफेक्शन च्या बाबतीत स्ट्रीक्ट होते. नशीब की लहान बाळ म्हणून बाहुलीच घेतलेली होती. चार एक तासांनी फायरची गाडी आली तोपर्यंत उर्मिला ओलेतीच उभी होती. चित्रिकरण पूर्ण झाले सूरकरांना मनासारखा शॉट मिळाला. पण या गडबडीत कलाकारांची तब्येत चांगली राहिली हे नशीब. धन्य ते डायरेक्टर व धन्य ते कलाकार. कारण यापूर्वी आसावरीच्या बाबतीतही असेच झाले होते. परफेक्शन साठी वाटेल ते करण्याची तयारी असलेल्यांचे यश पाठलाग करणे हे यावेळी पटते.

चौथा प्रसंग आहे "गोष्ट एका राणीची" या चित्रपटाच्या संदर्भातील. राणी हे लहान बाळ, तीन अनाथ मुलांना रस्त्यावर सापडते त्यावेळचा प्रसंग. रात्रीची वेळ, एक लहान मूल येशूच्या चौथऱ्यापुढे रडते आहे व तिथून तिघे लहान मुलगे जात असतात हा प्रसंग. शूट सुरू होते न होते तो पावसाची सर आली. लगेच थांबेल पाऊस म्हणून सर्व जण आडोशाला पळाले पण बाळ तसेच भिजत होते. थांबेलच पाऊस म्हणून थोडावेळ त्याला तसेच राहू दिले पण पाऊस थांबेना तेव्हा नंतर घेऊ शॉट म्हणून शूट थांबवले व बाळाला उचलले. बाळ अत्यंत गरीब दांपत्याचे होते. रिक्षावाल्याचे ते बाळ मानधनाच्या लालसेपायी त्याचे आई-वडील वापरू देत होते. त्या निमित्ताने त्यांनाही चांगलं चुंगलं खायला मिळत होतं. पण, हेच जर का आपलं मूल असतं तर.......? माझ्याजवळ उत्तर नव्हतं. त्या बाळाला आमच्या सिनेमातल्या पोरांचा छान लळा लागला होता. खऱ्या आई वडिलांसारखा, कारण आई-वडील लळा लागावा असे नव्हतेच मुळी. आमच्या चित्रपटा दरम्यान ते मूल छान टवटवले पण त्याच्या बाबतीत निष्काळजीपणा करण्याचा आम्हाला काहीही अधिकार नव्हता. ती टोचणी थोडी लागूनच राहिली होती मनाला.



# कविता

## अस्तित्व

- प्राची देशमुख

आज सगळंच कसं शांत शांत
माझ्या उरी तरी कोण अकांत
अव्यक्तात एक ठिणगी शिलगावली, अन्
संभ्रमाच्या कोलाहलात मला माझी चाहूल लागली
सुखावले तरी बावरलेली होतेच
भोवयाच्या गर्दीत शंकांचे मळभही होतेच
पाऊल अडखळले पण वाट सोबतीला आली, अन्
म्हणाली
वैशाख वणव्यातही गुलमोहोर फुलणारच
मिट्ट काळोखातही चंद्राची कोर हसणारच
आता सारं कसं निरभ्र आणि लख्ख आहे
कळी उमलणार हेही पक्कं आहे
खिडकीवर थिजून आता नुसतंच नाही आकाश बघायचं
अस्तित्वाच्या गोड जाणिवेला स्वप्नांचं कोंदण द्यायचं

## अट्टाहास

**- प्राची देशमुख**

विस्मृतींचा शाप न ज्याला
अशी आहेत काही आसवे
तुझ्या मखमली आठवांचे
अजून तिमिरात काजवे
तू आहेस अजुनही तिथे
मीच ओलांडली वेस
तुझ्याविना आता
जगण्याचा केवळ आभास
व्यर्थ आहेत सारी वचने आणि शपथा
ते सारे विलक्षण क्षणही आता वृथा
आपल्या अस्तित्वाच्या लढाईत घुसमटला नात्याचाच
श्वास
सख्या .... वाटलं होतं
तुझ्याविना असेल जगण्याचा केवळ आभास
पण ह्या एकाकी प्रवासात आता नवी क्षितिज शोधणार
आहे
तुझ्यात हरवलेल्या माझ्याकडे निरखून बघणार आहे
अडखळणाऱ्या पावलांना गगनाचा ध्यास
तुझ्याविना आता जगण्याचा नवा अट्टाहास

## राधा

- प्राची देशमुख

वेणुचे स्वर घुमू लागता
श्वसांवर ती थिरकत जाते
अव्यक्ताचे गीत आळविता
तीचीच आणिक वेणू होते

मौनांचे बोलके इशारे
नकळत मोहरणारे शहारे
सौभाग्याच्या हिंदोळ्यावर
स्वप्न स्वप्न ती मिरवीत जाते
अव्यक्ताचे गीत आळविता
तीचीच आणिक वेणू होते

गहिवरले तरी तृप्त हे अंतर
श्वसांहूनही समीप तो क्षण
सावळ्याच्या तेजामध्ये
स्वयंप्रकाशी ती तेवत जाते
अव्यक्ताचे गीत आळविता
तीचीच आणिक वेणू होते



# गौरी आता जागी झाली आहे

- ज्योति जोशी

तुझ्या डोळ्यान्तील ममता त्यानी
अमानुषतेच्या प्यालात बुडविली
तुझ्या दोन्ही स्तनांमधील दुधाची धार
त्यांची तहान बुझवु शकली नाही..
तुझ्या बेंबीतून वर येणारी शतकमलांची नाळ
मुळासकट कापून टाकली
अन सृजनाचा खून करत राहिले
आजी आई लेक बहिण साऱ्यांना
मोजलं एकाच उपभोगाच्या माळेत
ओरबाडून नखोऱ्यांने पुढे पुढे सरकवत राहिले मणी
पण पण आता विसारा म्हणा सार ते
आता तुझ्या डोळ्यांतील ममता अंगारात भडकलीय
कलीयुगातूनच आता काली सीतेच्या अग्निदिव्यातून
धुमसून बाहेर आलीय.. द्रौपदीचि वस्त्रे लेवून
गौरी आता जागी झाली आहे !
गौरी आता जागी झाली आहे !

(*तारीख २२ ऑक्टोबर २००५*
*ठिकाण पाकिस्तान. एक ग्रामीण, शोषित स्त्री, कधीही शाळेत न गेलेली. नराधमांविरुद्ध लढली आणि जिंकली. ज्या १४ नराधमांनी तिच्यावर बलात्कार केला त्यांस तिने तुरुंगवासी धाडले. त्यांना USA च्या स्त्री संघटनेकडून Golden Award दिला गेला.*)



# स्त्री शक्ती अन वास्तव

- नयना निगळये

आडरानी आडवाटेला
अतिरम्य तुझा हा गाव
मी उरले माझी आता
मज नको तुझे आडनाव

मातीच्या अंधुक वाटा
मातीत मिसळुनी गेल्या
मी अर्घ्य उभ्या जन्माचे
तू दिवस साजरा केला

काळीज उकलले जेव्हा
वेढले मला वळणाने
हुरहुरल्या क्षितिजानेही
सत्कार कोरडा केला

ममतेच्या बेड्यांसाठी
व्यापार आईचा झाला
मज यात्रेची पुण्याई
मग प्रवास जरी तू केला

मी दुर्गा शक्ती गीता
मी कुंती द्रौपदी सीता
गवसले मला मी जेव्हा
श्रृंगार मढ्याला केला

माझ्याच आईच्या पोटी
मी जन्माआधीच विरले
स्त्रीत्वाचा गौरव करण्या
भिंतीवर नारे उरले !!



*(स्त्री शक्ती अन वास्तव रेखाटते पूर्वापार असामान्य शक्ती आणि सामर्थ्याचे प्रतीक असलेल्या स्त्रीचे वास्तववादी मनोगत. मग ती स्त्री कधी असते न जन्मलेली बालिका, कधी अबला तर कधी बाईपणाच्या चौकटीतून स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्नरत सबला. जेव्हा या साऱ्याला मूठमाती मिळेल तोच खरा स्त्रीदिन. शब्द तेच, साकारतात स्त्रीचे मनोगत तीन वेगव्या भावना अन भूमिकांतून.*
*नयना निगळये या न्यूयॉर्क मध्ये गेली २० वर्षे स्थयिक. लहानपणापासून साहित्यआणि लिखाणाची आवड आणि जीवनाचे विविध रंग कवितेतून अनुभवण्याचे स्वप्न.)*



# करुणा अब अरूणा न जाओ

- सुनयना कचरू भिडे

जितने रिश्ते उतने नाम
मेरी दौड़ पे लाख लगाम
मेरे देश के पंख सुनहरे
लेकिन हम कगार पे ठहरे
इसी कोख़ से जना समाज
मेरे माथे पे कई रिवाज

कभी  लिओने कभी करीना
कभी मेनका  कभी  समीना
कम ज्यादा कपड़ो की बात में
दिन की देवी ललचाये रात में
घूंघट और हिजाब ले आओ
अग्नि परीक्षा पर ले जाओ
तसलीमा की कलम तोड़ दो
फिर दो चार इलज़ाम जोड़ दो

शूर्पणखा की नाक कटेगी
पांचाली पांचों में बटेगी
"ना" कहने से जलेंगे चहरे
तेज़ाबों से गलेंगे चेहरे

मेरे जन्म को श्राप ही कहना
झुके तो पश्चाताप ही कहना
माहवारी परतों में छुपाना
पति मरे तो सर मुंडवाना

जिस्मों के लेखे-जोखे में
तुम मुझको एक "दाम" समझते
बेटी, प्रिय, माँ, सखी से पहले
काश कभी इंसान समझते

वस्त्र मेरे तो बदल दिए
शास्त्र मेरे मैं बदल ना पाई
मेरे हाथ रफ़्तार थमाकर
पैरों में बेड़ी पहनाई

अपनी सोच को और टटोलो
हिंसा की किस्सों को खोलो
कहाँ प्रगती विकास कहाँ है
तुम ही बोलो कुछ तो बोलो

हौसले ख़ुद ही उगाओ
गिरो-गिरो फिर भी उठ जाओ
रहने दो ना.....ज़ख़्म छुपाओ
किसी और का चाँद बनो पर
अपनी आखं के दीप जलाओ
रहने दो अब ना. .ज़ख़्म छुपाओ

करुणा तुम अरुणा बन जाओ
करुणा तुम अरुणा बन जाओ
करुणा तुम अरुणा बन जाओ



# वादळी

- नयना निगळये

झुळूक मंद मोहरते
वादळी असावध वेळी
परसात वाकल्या थोड्या
पिकलेल्या गाभण केळी

वाऱ्याची साद शिळेची
सळसळली पानांत
पानगळीचे काहूर
कातर रान मनांत

वाऱ्याचा अवखळ झिम्मा
रानात पेटले पान
विझलेल्या वणव्यामागे
दग्ध एकटे रान

विणलेली अर्धी घरटी
अर्ध्यातच धुरकटलेली
ती हिरवी पिवळी माया
मग भूतबाभळी झाली

नाजूकशा थेंबामधूनी
तरंग अलगद झरला
प्रलयाच्या लाटेमध्ये
निःशब्द किनारा उरला

कोकणातल्या डोंगर आणि सागर किनाऱ्याच्या संगमावर साकारलेली ही कविता कोकणातून घाटांवर जाणाऱ्या एका वादळाचा माग घेते. डोंरकपारीतील सुखावणारी मंद झुळूक बघता बघता वादळी बनते आणि क्षणार्धात शांत कोकण उध्वस्त करते. पायथ्याशी खळखळणारा किनारा मात्र तसाच धीर देत उभा... अगदी निःशब्द...

जीवन तरी निसर्गाहुन वेगळं थोडंच असतं! कधी कधी एखादी मंद शांत झुळूक नकळत वादळी बनते आणी घेते सर्वस्वाची आहुती. या साध्याशा जगरहाटीचा एका स्त्रीच्या दृष्टीकोनातून मागोवा आणि तिच्यातील 'बाई' आणि 'आई' मधील अटळ द्वंव. 'ती'च्यातील बाई पानाएव्हढी आणि आई रानाएव्हढी. या वादळी वणव्यात सुगरणीच्या घरट्यानी लगडलेलं हिरवे पिवळे बाभूळबन सुकून काटेरी, आईची वत्सल माया वगळता उरते ती एकटी काटेरी बाभूळ. एकट्या बाभळीपाशी भूतं गोळा होतात हा कोकणी लोकप्रवाद. जेव्हा वादळ वणवा सरून जातो तेव्हा उरते ती फक्त आई; निःश्चल, अफाट सामर्थ्याने प्रलयाच्या लाटेला पुरून उरणाऱ्या किनाऱ्यासारखी; तिच्या घरट्यासाठी...

# बालजगत

## चित्रकला

अनुश्री लोटलीकर
(११ वर्षे)




अन्विता वाडेकर (११ वर्षे)



केया गांधी (७ वर्षे)




यश भिडे (११ वर्षे)




क्रिश गांधी (१० वर्षे)






# शब्दकोडे सोडवा


प्रसिद्ध भारतीय स्त्रिया
रोहिणी जोशी
(१७ वर्षे)
आडवे :
१. जानकी
३. ______ होळकर (इंदूरची राणी)
५. ______ चावला (अंतराळवीर)
६. ______ विल्यम्स (अंतराळवीर)
७. ______ जोशी (डॉक्टर)
८. ______ गांधी (पंतप्रधान - भारत)
उभे :
२. औरंगजेबाशी लढणारी मराठी राणी
४. रायगडाच्या कड्यावरून उतरलेली शूर स्त्री
५. ______ हॅरिस (उपराष्ट्रपती - अमेरिका)
६. ______ मूर्ती (लेखिका)
७. ______ भोसले (गायिका)
८. ______ नूयी (सी. ई. ओ.)

# बालकथा

## दिवाळी

शरयु जोशी (१४ वर्षे)

दिवाळीला आम्ही खूप फराळ खातो आणी मजा करतो. आम्ही पणत्या आणी आकाश कंदिल बाहेर लावतो. आम्ही रोज पूजा पण करतो. दिवाळीच्या आधिचा दिवस आहे वसुबारस. ह्या दिवशी, गायींची पूजा करतो. त्याच्यानंतरचा दिवस आहे धनत्रयोदशी. धनत्रयोदशीला धनाची पूजा करायची असते. दिवाळीचा मुख्य दिवस नरकचतुर्दशी. या दिवशी पहिली आंघोळ करतो. कृष्णाने नरकासुराला मारले. त्यानंतर लक्ष्मीपुजनाला लक्ष्मीची पूजा करायची. मग पाडवा येतो. पाडवा म्हणजे बलीप्रतिपदा. शेवटचा दिवस भाऊबीज. भावाना ओवाळायचे असते. असा हा मोठा सण साजरा करतो!



रांगोळी



## दसरा

दसऱ्याला रामाने रावणाला मारले. म्हणून लोक रावणाची प्रतिकृती जाळतात. अस्त्र शस्त्रांची पूजा करायची असते. मी माझ्या क्रोमबुकची पूजा केली. आईने गोड पूरण केले होते. नवरात्रीची शेवटची आरती केली. प्रसाद खाल्ला. असा आम्ही हा सण साजरा केला!

-अर्णव जोशी
१२ वर्षे

# The Mysterious Figure

- अनुश्री लोटलीकर (११ वर्षे)

John, was a 12 year old boy, who lived in America. He was bold and not scared of anything. As usual, he had gone to school, there all his friends were talking about a haunted house, so when he got home back, he asked his father about this haunted house.

His father answered, 'The Mayor has asked someone to go inside this haunted house located in Summer Street and bring out the most precious Sapphire. If anyone does so he will get 10000 Dollars !" and showed him the flyer.

## MAYOR'S ORDER

**A person full of courage, shall go in Summer Street's Haunted house and bring the SAPPHIRE.**

**Reward : $10.000**



John thought about it, he wasn't scared of anything. After a lot of thinking he decided to go, but without telling anyone. The next day morning, he told his father that he would be going to his friends house to stay overnight post school. His father allowed him and John was very happy.

Once school was over, he went in Summer Street and saw the wrecked haunted house. He slowly walked towards it and opened the door, but there was nothing scary. He said to himself, "Hey, I thought this would be scary, but it's not scary at all. Just then a creepy voice said, "*#!@ You've barely seen the house, come in you'll see if its scary or not #@*". John's feet froze to the ground, he couldn't move. He was just too scared.

John gathered up all his courage and moved one step forward. As he went on it got darker and darker and huge wind blew which didn't let him go forward. He could hear the creaking of a door. As the door opened, he couldn't see anything. He heard the footsteps of someone walking towards him, but he couldn't quite see him. "What do you want ?", a voice asked him. John stammered, "I... w..ww .. want.. the ... the.. sapph... sappph... Sapphire. "Oh, really! the Sapphire.. you will never get it, unless.... replied the Voice." "Unless ?" John asked. "Well, listen to my story", the voice said.

"I was a small little boy, just like you. I was playing with a ball, when the ball flew across fencing. I went to take the ball, when a nice old lady said, "Wait, little child, come in and have some cookies." I was hungry that moment, so I thought I should go. When I entered the house, I saw the heads of real animals, I was bit scared. As the lady bought the cookies, my mouth started watering. As I took a

bite of the cookie, the lady started cackling wickedly and said, “Finally! I have the ingredient to my recipe.” I couldn’t breathe and I fainted. The old lady turned into a wicked witch and took my heart and flew away. Since then I’m locked in this house.” John, wasn’t scared anymore, he felt sorry for the figure, who was narrating the story. He asked “Isn’t there a solution?” The figure replied, “yes, there is.., if you go up stairs and open the door, you will find both the medicine to break my spell and the Sapphire.”

John was happy, he was going to break the figures spell and get the Sapphire so went headed towards the stairs.






It wasn’t so easy to go upstairs. He could hear blood curdling noises. He could hear the bats flapping their wings. It seemed as if the stairs were never ending. Finally he reached the door, opened it and bought the Sapphire and the medicine. Suddenly the door got closed, John was locked inside. “Help ! Help ! , John cried. The figure heard sound of John and came up. He remembered the spiritual powder his mother had given, when he was a boy and he still had it in his locket. His mother had said to use it, when you are in trouble. He knew that John was in trouble and John was going to save him, he should save John too, so he sprinkled some powder outside the locked door and the door opened. John was very pleased and he said, “Thank you so much, here’s your medicine.” The figure drank it immediately and turned back into a boy. They both were happy and came out of the Haunted house. The boy went back to the house, where he used to live. John was surprised to see, that it was morning and he had spent the entire night in the haunted house. John went home, his parents were worried, as John was not contactable. His father asked, “Where had you been?”. John showed the Sapphire and smiled. “It’s a long story.” he said.

The mayor was pleased to see the Sapphire and rewarded John $ 10,000. Johns name was flashed in the newspaper and he became very famous.



# अपंग व अनाथांमधील साम्य

` - साक्षी सुरेश माच्चल्ला

अनाथांचं जीवन हे वेगळच असतं, अपंगा प्रमाणे
अपंगाला जसा हात नसतो, तसा अनाथाला बाप नसतो
अपंगाला जसा पाय नसतो, तशी अनाथाला आई नसते
दोघेही सारखेच, दोघांत काही फरक नसतो

अनाथ जसे स्वप्न पाहतात तसे अपंग ही पाहू शकतात
मोठे फक्त आपणच नव्हे तर अपंग ही होऊ शकतात
पाय नाही म्हणून काय झालं? हात नाही म्हणून काय झालं?
मन तर आहे ना समुद्रासारखं
आई नाही म्हणून काय झालं? वडील नाही म्हणून काय झालं?
प्रेम तर आहे ना नात्यांसारख

बालपण गेल संस्थेत, पण कधी भासलं नाही मला कोणी नाही
आई सारख प्रेम देणाऱ्या मॅडम
बहिणीं सारख प्रेम देणाऱ्या मुली
मालूआई सारख प्रेम देणाऱ्या आजी
आगाशे सरां सारख प्रेम देणारे आजोबा
आई सारख प्रेम देणाऱ्या माता
कधी वाटलं नाही मला आई नाही किंवा वडील नाहीत.
दोघांपेक्षाही ज्यास्त प्रेम केल ते बालसदन मधल्या व्यक्तींनी

आई असती तर परिस्थिती बघून शिकू दिलं नसतं,
पण संस्थेत आल्यामुळं हव तेवढं शिकायला मिळालं
त्यांचे हे उपकार मी कधीच फेडू शकणार नाही.



# युवा विभाग

## चित्रकला

सारा परुळेकर (१५ वर्षे)



# युवाकथा - Gender Inequality in India

- रेणुका लाटे (१४ वर्षे)

### INTRODUCTION

With India being one of the fastest growing economies in the world, it neglects one major social issue, gender inequality towards women. In a place where men are given better opportunities and social superiority, women are treated extremely poorly. Not only are they deprived during student life or during their career, but are also being abused, both mentally and physically, and sometimes restrictions in their own house.

These mentalities are still very much alive in more rural areas of India, but you can also find it in the biggest cities.

### The Proven Problem

There are many ways in which women are inferior to men. For example, abortions and leaving behind daughters has become frequent, the ratio of women to men in 2011 was 919 to 1000. There is a huge pay gap between men and women where women would be paid half the amount as a man who works just as much and hard.

### Social Perspective

The struggle for equality starts even before women are born. In India, families will keep trying for a son until they get one, leaving millions of unwanted girls behind. They feel as though a male child will prosper more and eventually give back to their own parents during retirement. As a girl grows up, some are prohibited from going to school or are forced to drop out at a young age to force to work around the house. Families make marriage and starting a family more of a priority than mental health and education for women. This leads to women being financially dependent on their husbands, making it harder for them to seek certain personality traits like being brave, independent, and confident.

### Mindset

Another way women are affected by gender inequality is due to how our minds think as a whole and what we associate it with. Growing up, our minds associate things like work and behaviors, to certain genders. For example, working as a boss or running for a spot in office are seen as masculine activities while activities like dance or teaching are seen as feminine. This association might be involuntary, but makes it harder to blend the world into a boundaryless world for gender.

### Caste System Comparison

The caste system categorizes in social classes called Varnas. These four Varnas are the Shudras, Vaishyas, Kshatriyas, and Brahmanas. In summary, it discusses how each class is categorized by each of their qualities. We can look at gender

inequality the same way as how the social classes are categorized. Men are seen as the more powerful and superior gender like the Brahmanas and Kshatriyas, while women are seen as weak and powerless like the Shrudas and Vaishyas.

### *Solution by Education*

To avoid this problem of having men, and others, with the mindset of seeing women as inferior, society should educate them. For example, in Pune, the Action for Equality program educates more than 5,000 teenage boys about gender-based violence, stereotypes, and how to make society a safer and more equal place. This helps young men to be more mindful and respectable. Thankfully, abortions that are done to discriminate against girls have been illegal all over the country. The Beti Bachao Beti Padhao (translates to save the daughters, educate the daughters) is a movement in India that started with Prime Minister Narendra Modi. This movement was to change the mindsets of people and celebrate their daughters. People sent selfies with them and their daughters, showing how happy and proud they are of their daughters.

### *A Decline*

Even though women seem to get more opportunities and equality, the overall rank for India has gone down. In 2006, India was ranked 98th (first place being the most equal). However, India's ranking drops 10 places down to 108th place in 2018. The percentage of female workers is also declining. In 2005, an alarming 32% of the Indian workforce was female. But in 2019, this percentage shockingly drops to 23%. However, this could be due to the number of women who are seeking education, instead of doing low-paying jobs. So, since the number of education goes up, the number of workers will go down. Hopefully, we soon can see a growth in the number of women in high-paying jobs.

### *My Analysis and Thoughts on Gender Inequality in India*

Gender inequality is a topic that is well known but still struggles to get the attention it deserves. Even though India has made slight progress, the mindsets of people have to change. Everyone should understand that women are the same as men, we are just as human as them. In fact, people like Indira Gandhi, the first and only female prime minister for India, show to us that women can do the same things as men. If I had a strong platform where my opinions were heard, like a politician, I would show all the achievements women have made to help the world. This will hopefully enlighten many young people to change their mindsets.

## *Summary*

Gender Inequality affects millions of lives on a day to day basis in India. Even though the gender boundaries are being broken and more information about this topic is spread, lot more needs to be done to the problem.

## *References*

**(1)** Larsen, Mattias. Vulnerable Daughters in India: Culture, Development and Changing Contexts. Routledge, 2016.

**(2)** Pune, Elaine Murphy in, and India. "The Boys Learning Anti-Sexism in India." BBC Future, BBC, 12 Nov. 2019, www.bbc.com/future/article/20191111-genderbased-violence-prevention-project-in-india

**(3)** University. "Achieving Gender Equality in India: What Works, and What Doesn't." United Nations University, unu.edu/publications/articles/achieving-genderequality-in-india-what-works-and-what-doesnt.html

**(4)** "The Global Gender Gap Report 2006." World Economic Forum, www.weforum.org/reports/global-gender-gap-report-2006

**(5)** "The Global Gender Gap Report 2018." World Economic Forum, www.weforum.org/reports/the-global-gender-gap-report-2018.

**(6)** https://data.worldbank.org/indicator/SL.TLF.CACT.FE.ZS?locations=IN

## *Bibliography*

My name is Renuka Late and I am fourteen years old. I live in Tewksbury, Massachusetts with my mom and dad. My older sister goes to college at WPI. In my free time, I like to hang out with my friends, paint, and listen to music. I play karate, which I am a black belt in and plays tennis and volleyball in high school. I am in ninth grader at TMHS. I would like to have a career in the medical field dealing with diseases and the body.

# भूषणावह असे

Rohini Joshi (१७ वर्षे)



**Rohini Joshi (रोहिणी जोशी)** was recently selected to be a Semi-finalist in the National Merit Scholarship Program. The program selects the top 1% of students in each state based on Preliminary SAT/National Merit Scholarship Qualifying Test (PSAT/NMSQT®) scores.

Rohini is a rising senior at Andover High School with interests in biology, engineering, and medicine. She is the assistant captain of the school BioBuilders club and has published award-winning articles in the Biotreks scientific journal. She also represented Andover High School as the leader of the Science Olympiad biology team at the MIT, Harvard, and Massachusetts state tournaments. Last year, Rohini won first place in the 'Women In Science' competition hosted by Thermo Fisher Scientific and Millipore Sigma. In her junior year, she was inducted into the National Honor Society.

Rohini's other interests include music and martial arts. She has participated in the high school orchestra as a violist and plays Veena as a disciple of Smt. Durga Krishnan. She has earned a black belt in Kung Fu and volunteers to give demonstrations in local schools to encourage kids to learn self defense.

Rohini goes camping and hiking with her family and feels passionate about forwarding the love of nature. Apart from helping with weeding and cleaning up public spaces, she designed sixteen brochures with trail maps, history, and art for all of the Andover Village Improvement Society (AVIS)'s reservations. These brochures were made available to the community by Andover library. Rohini is also a regular contributor to Anubandh magazine and enjoys creating crossword puzzles for her young friends.

# लेखक लेखिका सूची


ज्योती जोशी


पुष्पा लेले


आशा सौंदे (सलगर)


अमृता करकरे


दिलीप चावरे


समिधा साने


वीणा पेंडसे


स्वाती शिंदे


सुनयना कचरू भिडे


आदिती टेलर


रसिका भाविक वोरा


नीलिमा कासार


उना, गीता गंडभीर


वैजयंती जोशी


विद्या भुतकर


मनिषा तोडकर


नेहा गांधी


माधुरी अशिरगडे


प्राची देशमुख


नयना निगळये


अर्णव जोशी


रेणुका लाटे


शरयू जोशी


साक्षी सुरेश माच्वल्ल


जान्हवी जोगळेकर


अनुश्री लोटलीकर

# आवाहन ( पुढचे लिखाण )

नमस्कार मंडळी,

न्यू इंग्लंड मराठी मंडळ आपल्या विविध उपक्रमांद्वारे आपल्या सभासदांशी सातत्याने संवाद साधत असते. हाच संवाद 'अनुबंध' या मासिकाद्वारे द्विगुणित करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहे. त्यासाठी लागणार आहे तुमची साथ.

आपल्या अनुबंध साठी तुम्ही आमच्याकडे पाठवायचे आहे तुम्ही लिहिलेल्या कथा,ललित लेख, केलेल्या कविता, वाचलेल्या पुस्तकाचे परीक्षण,भेट दिलेल्या एखाद्या ठिकाणचे वर्णन, आठवण किंवा तुमच्या कॅमेरातुन काढलेली काही क्षणचित्रे,आपल्याला आवडलेला खाद्यपदार्थ आणि त्याची पाककृती , कला दालन या सदरात अपेक्षित आहे तुम्ही काढलेली हस्त-चित्रे, व्यंगचित्र, शब्दकोडी आणि अजुन बरेच काही तुम्ही लिहिलेले साहित्य .... . तसेच आपल्या छोट्या दोस्तांनी लिहिल्या गोष्टी, कविता, काढलेली चित्रे, हस्त-कलेचे, lego पासून बनवलेल्या creation ची क्षणचित्रे....

साहित्य पाठवण्यासाठी ई-मेल - registration@nemm.org

नियम :

- आपल्या लिखाणास वयोमर्यादेचे बंधन नाही. (लहानांपासून आजी आजोबांपर्यंत कोणीही लिहू शकते!)
- तुमचे साहित्य मराठी किंवा इंग्लिश भाषेमध्ये .doc फाईल मध्ये पाठवायचे आहे.
- आपले लिखाण जर कथा, प्रवासवर्णन या प्रकारात मोडत असेल तर शब्द मर्यादा १२००, माहिती स्वरूपातील लेख साधारण शब्द मर्यादा ४५० इतकी असावी.
- आपले साहित्य लेखाचा विषय नोंद करा.
- उचित व दर्जेदार लेखनास/साहित्यास प्राधान्य देण्यात येईल.
- साहित्य व लिखाण मिळाल्यावर पोच ई-मेलने दिली जाईल.
- फोटो, कलाकृती, जाहिरात Jpeg format मध्ये पाठवावे.
- 'अनुबंध' बद्दल आपला अभिप्राय registration@nemm.org या ई-मेल आयडी वर जरूर कळवा.